आला आला पाऊस आला..
रेनकोट / 2 in1 जर्किन
लहान मुलांपासून सर्वांसाठी
Branded Zeel/Boss/Only One Complete Range..!
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अहमदनगर.
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

FREE SUGAR 1 KG ON BILL OF RS. 1299*
11 MAY TO 31 MAY 2024
वारद फूड्स — EXCLUSIVE STORE —
कोहिनूर प्लाझा, पत्रकार चौक,
लोकमत भवन शेजारी, सावेडी रोड, अ.नगर
WhatsApp / Call on: 9403738822
रविवार बंद

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, सोमवार दि. २७.०५.२०२४ | अंक नं. ०६९ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

खरेदीवर आकर्षक गिफ्ट
आला रे आला राजपाल सेल आला..!
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
• फ्रेश स्टॉक • आकर्षक गिफ्ट • भरपूर व्हरायटी • भरपूर डिस्काउंट
सावेडी अ.नगर (0241) 2999299
संगमनेर (02425) 222226
नारायणगाव (02132) 242132

# शेअर बाजार निर्देशांकाची उच्चांकी पातळीवर सुरुवात

**आठवड्याच्या पहिल्याच दिवशी सेन्सेक्स ७५६७९ वर तर निफ्टी २३०४३ अंकांवर; अदानी समूहाला सर्वाधिक फायदा**

मुंबई - शेअर बाजारातील ऐतिहासिक तेजीचा कल सोमवारी (२७ मे) आठवड्याच्या पहिल्या दिवशीही कायम राहिला आहे. सकाळी बाजार उघडताच शेअर बाजाराने नवीन सर्वकालीन उच्चांक नोंदवला असून, व्यवसाय दरम्यान, मिडकॅप निर्देशांकानेही विक्रमी उच्चांक गाठला. बीएसई सेन्सेक्सने ७५,६७९ अंकांची पातळी गाठली तर निफ्टीही २३,०४३ अंकावर पोहोचला. दरम्यान, बाजाराच्या तेजीचा सकाळच्या सत्रात अदानी समूहाला सर्वाधिक फायदा होताना दिसत असून, सूचिबद्ध १० पैकी ९ कंपन्यांचे शेअर्स वधारले तर फक्त अदानी एंटरप्रायझेसचा शेअरमध्ये घसरण दिसत आहे.

आठवड्याच्या पहिल्या व्यवहाराच्या दिवशी, दोन्ही शेअर बाजार निर्देशांक बीएसई आणि एनएसई हिरव्या रंगात रंगले. बीएसई सेन्सेक्सची २१४.२० अंकांच्या वाढीसह ७५,६२४.५९ पातळीवर ओपनिंग झाली तर एनएसई निफ्टी २३,०३८.९५ अंकांवर उघडला. सुरुवातीच्या व्यापार सत्रात निफ्टी ५७.४० अंकांच्या किंचित वाढीसह २३,०१४.५० स्तरावर व्यवहार करत होता.

दरम्यान, बाजारातील तेजीचा बॉम्बे स्टॉक एक्सचेंजला सर्वाधिक फायदा होत असून बीएसईचे मार्केट कॅप रेकॉर्डवर रेकॉर्ड करत आहेत. सध्या बीएसईचे बाजार भांडवल ४१९.८२ लाख कोटींवर पोहोचले असून, आता मार्केट कॅपने जवळपास ४२० लाख कोटींचा आकडा पार केला आहे.

## सेन्सेक्समधील शेअर्सची स्थिती काय

बाजाराच्या सकाळच्या सत्रात बीएसई सेन्सेक्समध्ये सूचिबद्ध ३० पैकी १९ शेअर्समध्ये हिरवळ दिसत असून, ११ शेअर्स घसरत आहेत. सेन्सेक्समधील तेजीचा एचडीएफसी बँकेचा स्टॉक लाभधारक ठरला आणि १.१६ टक्क्यांनी वधारला. तसेच कोटक महिंद्रा बँक ०.९९ टक्के आणि इंडसइंड बँक ०.९३ टक्क्यांनी वधारला. याशिवाय अल्ट्राटेक सिमेंट ०.९० टक्के आणि भारती एअरटेल ०.७६ टक्क्यांनी वर चढला. याउलट, विप्रो लिमिटेडचा स्टॉक सर्वाधिक १.५० टक्क्यांनी घसरला असून मारुती १.२०% खाली आता तर एनटीपीसी, महिंद्रा अ‍ॅण्ड महिंद्रा, पॉवरग्रिड आणि रिलायन्स इंडस्ट्रीजच्या स्टॉकलाही प्रचंड नुकसान झाले.

## निफ्टीत कोण तेजीत, तर कोण घसरले

एनएसई निफ्टीच्या ५० पैकी २४ स्टॉकमध्ये तेजी दिसत असून, २४ शेअर्स घसरत असताना दोन शेअर्समध्ये कोणताही बदल झालेला नाही. डिव्हीज लॅबच्या स्टॉकने सर्वाधिक ५.५२ टक्क्यांनी झेप घेतली तर हिंदाल्को १.४५%, अदानी पोर्टस् १.१५%, इंडसइंड बँक १.०६% आणि एचडीएफसी बँक ०.९९% वाढीसह व्यापार करत आहे. दुसरीकडे, अदानी एंटरप्रायझेस २.७१%, विप्रो १.६५%, ओएनजीसी १.६१% खाली घसरला आहे.

# चाकूचा धाक दाखवून पहाटे महामार्गावर दाम्पत्याला लुटले

**पावणेचार लाखांचे दागिने पळविले, नगर-पुणे महामार्गावर केडगाव बायपासजवळील घटना**

नगर - रात्रीच्या वेळी नगरकडून पुण्या कडे चारचाकी वाहनातून चाललेल्या दाम्पत्याला तिघा अज्ञात चोरट्यांनी चाकूचा धाक दाखवून लुटत त्यांच्या जवळील सुमारे ३ लाख ७२ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने पळवून नेल्याची घटना रविवारी (दि.२६) पहाटे २ च्या सुमारास नगर पुणे महामार्गावर केडगाव बायपास चौकाच्या पुढे असलेल्या हॉटेल कोकण किंग जवळ घडली.

याबाबत पार्था सारथी पटनाईक (वय ४२, रा. हांडेवाडी रस्ता, हडपसर, पुणे) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी पटनाईक हे पत्नी व मुलासमवेत रविवारी (दि.२६) पहाटे कार मधून नगरहून पुण्याकडे जात होते. केडगाव बायपास चौकाच्या पुढे गेल्यावर हॉटेल कोकण किंग जवळ त्यांच्या मुलाला लघुशंकेसाठी त्यांनी रस्त्याच्या कडेला कार थांबवून खाली उतरले. त्यावेळी तेथे ३ अनोळखी इसम आले. त्यांनी फिर्यादी व त्यांच्या पत्नीला चाकूचा धाक दाखवत दमबाजी केली.

त्यानंतर फिर्यादीच्या पत्नीच्या गळ्यात असलेले सोन्याचे मंगळसुत्र, हातातील २ सोन्याच्या बांगड्या, ३ अंगठ्या असे सुमारे ३ लाख ७२ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने बळजबरीने काढुन घेत तेथून पसार झाले. या घटनेनंतर घाबरलेल्या फिर्यादी पटनाईक यांनी नातेवाईकांशी संपर्क साधून माहिती दिली. नातेवाईकांच्या मदतीने कोतवाली पोलिसांशी संपर्क साधला.

या घटनेची माहिती मिळताच कोतवाली पोलीस ठाण्याचे पो.नि. प्रताप दराडे, तोफखान्याचे पो.नि आनंद कोकरे, उपनिरीक्षक कृष्णकुमार सेंदवड यांनी पोलीस पथकासह घटनास्थळी भेट दिली. अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, शहर विभागाचे उपअधीक्षक अमोल भारती आदींनीही घटनास्थळी भेट देत कोतवाली पोलिसांना तपासाबाबत सूचना दिल्या. याबाबत पटनाईक यांनी दिलेल्या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात ३ चोरट्यांच्या विरुद्ध भा. दं. वि. कलम ३९४, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

कथा स्थल
कोहिनूर मंगल कार्यालय
पारिजात रोड, गुलमोहर रोड, सावेडी, अहमदनगर
सादर आमंत्रण
विनीत
श्री राम कथा सेवा समिति, अहमदनगर
परम श्रद्धेय स्वामी श्री प्रियाशरणजी महाराज
श्री राम कथा रस रहस्य
श्री 1008 श्री हनुमान चालीसा पाठ * प्रतिदिन कथा प्रारंभ से पूर्व
दिव्य श्री 1008 श्री राम कलश यात्रा * 12 जून को प्रातः 7 बजे से
श्री गजानन महाराज मंदिर, नवले नगर, गुलमोहर रोड, से कथास्थल तक
दिनांक
12 जून से 20 जून 2024
समय
दोप. 3 से 7 बजे तक

# राज्याचा १० वी च्या बोर्ड परीक्षेचा ९५.८१ टक्के निकाल

**कोकण विभागाचा सर्वाधिक तर नागपूर विभागाचा सर्वात कमी निकाल**

पुणे - महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. यंदा दहावीचा निकाल ९५.८१ टक्के लागला आहे. कोकण विभागाने निकालाने बाजी मारली असून, कोकण विभागाचा निकाल सर्वाधिक ९९.०१ टक्के लागला. तर नागपूर विभागाचा निकाल सर्वांत कमी ९४.७३ टक्के लागला.

राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी पत्रकार परिषदेत निकाल जाहीर केला. मंडळाच्या सचिव अनुराधा ओक, सहसचिव माणिक बांगर या वेळी उपस्थित होते. यंदा दहावीच्या परीक्षेला विद्यार्थी नोंदणी वाढली होती. नऊ विभागीय मंडळांमार्फत ही परीक्षा घेण्यात आली. एकूण १६ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी या परीक्षेसाठी नोंदणी केली होती. निकालात मुलांपेक्षा मुलींच्या उत्तीर्णतेचे प्रमाण जास्त आहे. ९४.५६ टक्के मुले उत्तीर्ण झाली असून, ९७ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. गेल्यावर्षी ९३.८३ टक्के निकाल लागला होता. गेल्यावर्षी राज्यातील १०८ विद्यार्थ्यांना शंभर टक्के गुण मिळाले होते.

राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी म्हणाले, की यंदा परीक्षा निकोप वातावरणात पार पाडण्यासाठी कॉपीमुक्त अभियान राबवण्यात आले. त्यासाठी २७१ भरारी पथके, महिलांची विशेष पथके नियुक्त करण्यात आली होती. त्याशिवाय जिल्हा स्तरावर स्वतंत्र पथके नियुक्त करण्यात आली होती. आठ माध्यमांत ही परीक्षा घेण्यात आली. प्रात्यक्षिक परीक्षांचे गुण ऑनलाइन घेण्यात आल्याने निकाल लवकर जाहीर करण्यास मदत झाली.

- सुपर वेल्हर बर्गर @ 49/-₹
- क्लासिक सॉल्टेड फ्राईज @ 49/-₹
- पेरी पेरी फ्राईज @ 69/-₹
ही जाहिरात दाखवा आणि मिळवा स्मॉल मॉकटेल फ्री. फ्री.
टिप : २००/- रु. किंवा अधिकच्या खरेदीवर ही ऑफर लागू.
UFO Fries & Corn
प्रोफेसर चौक, सावेडी, अ.नगर

# नगर जिल्ह्याचा १० वी बोर्ड परीक्षेचा ९५.२७ टक्के निकाल

**गतवर्षीच्या तुलनेत निकालात १ टक्क्याने झाली वाढ; यावर्षीही मुलींनी मारली बाजी**

नगर - राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने मार्च २०२४ मध्ये घेतलेल्या इयत्ता १० वी च्या परीक्षेचा निकाल सोमवारी (दि.२७) दुपारी १ वाजता ऑनलाईन जाहीर केला आहे. नगर जिल्ह्याचा निकाल ९५.२७ टक्के लागला असून गतवर्षीच्या तुलनेत निकालात १ टक्क्याने वाढ झाली आहे. गतवर्षी नगर जिल्ह्याचा ९४.४८ टक्के निकाल लागला होता.

या निकालामध्ये यावर्षीही मुलींनी बाजी मारली आहे. मुलींचा निकाल ९७.०१ टक्के तर मुलांचा ९३.८५ टक्के लागला आहे. जिल्ह्यात पारनेर तालुक्याचा सर्वाधिक ९६.५३ टक्के निकाल लागला आहे. या निकालात पुणे विभागात पुणे जिल्ह्याचा ९७.३० टक्के व सोलापूर जिल्ह्यांचा ९५.९२ टक्के निकाल लागला असून नगर जिल्हा सलग तिसऱ्या वर्षीही तिसर्या क्रमांकावर ९५.२७ टक्के आहे.

नगर जिल्ह्यात ६७ हजार ९७० विद्यार्थी दहावीच्या परीक्षेला बसले होते. त्या पैकी ६४ हजार ७६१ विद्यार्थी पास झाले आहेत. तर ३ हजार २०९ विद्यार्थी नापास झाले आहे. पास होणार्यांमध्ये मुलींचे प्रमाण ९७.०१ टक्के तर मुलांचे प्रमाण ९३.८५ टक्के एवढे आहे.

## जिल्ह्यात पारनेर तालुक्याचा सर्वाधिक निकाल

या परीक्षेच्या निकालात पारनेर तालुका प्रथम क्रमांकावर आहे. पारनेर चा निकाल ९६.५३ टक्के लागला आहे. जामखेड - ९६.५०, श्रीगोंदा - ९६.४२, अकोले - ९६.३६, शेवगाव - ९५.८९, कर्जत - ९५.९९, कोपरगाव - ९४.३३, नगर - ९५.३३, नेवासा - ९५.७३, पाथर्डी - ९५.७३, राहता - ९४.४३, राहुरी - ९४.२३, संगमनेर - ९५.६०, श्रीरामपूर ९२.५२ टक्के असा जिल्ह्याचा एकूण ९५.२७ टक्के निकाल लागला आहे.

# आठवड्याच्या सुरुवातीलाच सोन्या-चांदीच्या दरात वाढ

नवी दिल्ली - सोने आणि चांदीच्या दरांमध्ये पुन्हा एकदा दरवाढीचे सत्र सुरू झाले आहे. गेल्या आठवड्यात सोन्याच्या दरात लक्षणीय घट होऊन मौल्यवान धातू स्वस्त झाले होते. मात्र सोमवारी (दि.२७) सकाळपासून सोन्याच्या दरात वाढ नोंदवली जात असताना चांदीचा किंमतीत पुन्हा एकदा ऐतिहासिक तेजी नोंदवली गेली आहे.

सोमवारी सोन्या-चांदीच्या दरात पुन्हा वाढ होताना असून गेल्या आठवड्याच्या सुरुवातीला सोन्या-चांदीने विक्रमी उच्चांक गाठला, मात्र त्यानंतर मौल्यवान धातूच्या किंमतीत मोठी सुधारणाही झाली. सोन्याची किंमत दोन हजार रुपयांनी स्वात झाली पण आता आठवड्याच्या पहिल्या व्यापार दिवशी दोन्ही मौल्यवान धातूवर तेजीचा रंग चढला आहे. देशांतर्गत फ्युचर्स बाजारात सोन्याचा भाव सुमारे २५० रुपयांनी तर चांदीचा भाव १,३०० रुपयांनी महागला आहे.

सोमवारी बाजाराच्या सुरुवातीला मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर सोन्याचा भाव २४० रुपयांनी वाढून ७१,४९६ रुपयांवर पोहोचला जो गेल्या आठवड्यात शुक्रवारी, ७१,२५६ रुपये प्रति १० ग्रॅमवर बंद झाला. दुसरीकडे, सोन्यासह चांदीचा दर १,३५२ रुपयांच्या वाढीसह ९१,९०० रुपये प्रति किलोवर पोहोचला आहे.

बोअरची किंवा हौदावरची मोटर खराब झाली आहे!
मग वाट कसली बघताय, आजच अभय सेल्सशी संपर्क साधा..
* खात्रीशीर काम तेही योग्य दरात
मे. अभय सेल्स कॉर्पोरेशन हार्डवेअर
सर्वोदय कॉलनी समोर, गजानन हॉस्पिटल शेजारी, सातभाई मळा, दिल्ली गेट, अहमदनगर
9145008009 / 9822542011

शिबीर । शिबीर ।। शिबीर ।।।
डॉ. अद्वैत गिते
MBBS, MD (Medicine) DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन
नगरमध्ये प्रथमच जपानच्या अत्याधुनिक निहॉन कोडेन मशिनवरील EMG, EEG, NCV, VEP तपासणी शिबीर
कालावधी : ३१ मे २०२४ पर्यंत..
५० टक्के तपासणीत सवलत
अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे
एशियन नोबल हॉस्पिटल प्रेमदान चौक, अ.नगर रोज दुपारी १ ते ५ या वेळेत

SONI TILES AND MARBLE INDUSTRIES Since 1965
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अ‍ॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## शहराचे नाव बदलले - दृष्टिकोनही बदलू या

दरवर्षीप्रमाणे आपल्या शहराचा स्थापनादिन विशेष २८ मे आलाय. पण यावर्षीचे वैशिष्ट्य म्हणजे आता अहमदनगर नाव बदलून अहिल्यानगर झाले आहे. शहराचे नाव बदललंय. आता आपण सर्वांनी मिळून दृष्टिकोनही बदलू या. आपल्या नगरीचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न करू या.

आता हे रडगाणं बंद करू या की आपलं शहर एक मोठं खेडं आहे. पुणे-नाशिक-औरंगाबाद पुढे गेलेत वगैरे वगैरे. आता नव्याने कात टाकून शहर कसे स्वच्छ, सुंदर, किमान मुलभूत सेवा सुविधांनी परिपूर्ण व विकसित होऊ शकेल याची आशा, विश्वास ठेवून कार्य करावे लागेल.

लोकप्रतिनिधी, विशेषतः नगरसेवक, महापालिका प्रशासन, इतर संबंधित प्रशासकीय खाते आणि सृजनशील सामाजिक संस्थांना प्रामाणिकपणे झटावे लागेल.

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन

संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१

आम्हा नगरकरांनाही घराप्रमाणे किमान आपले प्रभाग, गल्लीच्या प्रगतीत हातभार उचलावा लागेल. चुकीचे काम होत असेल तर जाब विचारण्याची तयारी ठेवावी लागेल. नागरिक जागृत असेल तरच समाज, शहर पुढे जाईल. सुदैवाने पुढे येणाऱ्या महापालिका निवडणुकीत यादृष्टीने प्रतिनिधी निवडण्याची संधी मिळणार आहे.

पुण्यश्लोक अहिल्याबाईंनी शेकडो वर्षे टिकणाऱ्या सुधारणा करून ठेवल्यात. त्या आदर्शांचा पालन करण्याचा आपणा सर्वांना प्रयत्न करावा लागेल. तरच उज्वल भविष्य.. यासाठी नगरकरांना हार्दिक शुभेच्छा.

- किशोर गांधी



## रेल्वे उड्डाणपुलाजवळ आढळला युवतीचा मृतदेह



मनिषा बेलापूरकर

नगर - कल्याण रस्त्यावरील रेल्वे उड्डाणपुलाजवळ रविवारी (दि.२६) पहाटे एका १९ वर्षीय युवतीचा मृतदेह आढळून आला. मनिषा सुभाष बेलापुरकर (रा. झारेकर गल्ली, नालेगाव) असे मयत युवतीचे नाव आहे. नालेगाव भागात लेडी डॉन मनी नावाने परिचित असलेल्या मनिषाचा मृतदेह पहाटे सहा वाजण्याच्या सुमारास आढळून आला. जिल्हा रूग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. कुलकर्णी यांनी तिला मृत घोषित केले.

तोफखाना पोलीस ठाण्याचे जिल्हा रूग्णालयात नियुक्त असलेले सहाय्यक फौजदार जठार यांच्या खबरीवरून तोफखाना पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. दरम्यान, मनीषा हिच्या मृत्यूची बातमी पसरल्यानंतर काहींनी घातपाताची शक्यताही व्यक्त केली. मात्र, शवविच्छेदनानंतर ही शक्यता पोलिसांनी फेटाळली आहे. मयत मनीषाच्या आईचा जबाब पोलिसांनी घेतला आहे. त्यानंतर घरगुती वादातून तिने आत्महत्या केली असावी, असा अंदाज पोलीस व्यक्त करत आहेत. तपास पोलीस अंमलदार भास्कर गायकवाड करत आहेत.

## अर्जुनराव पठारे यांचे हृदयविकाराने निधन



नगर - केडगाव-नेप्ती रोडवरील पठारे मळा येथील रहिवासी अर्जुनराव (नाना) भाऊसाहेब पठारे (वय ६२) यांचे २७ मे रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर केडगाव येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे बाळासाहेब व भरत पठारे ही २ मुले, प्रमिला जालींदर कोतकर ही मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## लक्ष्मीबाई भोसले यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - बुरुडगाव रोडवरील साईनगर मधील रहिवासी श्रीमती लक्ष्मीबाई पुंडलीकराव भोसले (वय ८२) यांचे २६ मे रोजी सकाळी ९.४५ वा. वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर दुपारी नालेगाव अमरधाम-मध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

माजी उपमहापौर गणेश भोसले यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## चांगुणाबाई ढुस यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - देवळाली प्रवरा (ता.राहुरी) सोसायटीच्या माजी संचालिका श्रीमती चांगुणाबाई भिमराज ढुस (वय ८०) यांचे २७ मे रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर देवळालीप्रवरा येथील ढूसवस्तीवर अंत्यसंस्कार करण्यात आली. त्यांच्या पश्चात अरुण व आप्पासाहेब ढूस ही २ मुले, २ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## बॉम्बे फ्युएल इंजेक्शनचे संचालक रंगा शेट्टी यांचे निधन



नगर - शहरातील उद्योजक बॉम्बे फ्युएल इंजेक्शनचे संचालक रंगा मंजुनाथ शेट्टी यांचे नुकतेच अल्पश: आजाराने दुःखद निधन झाले. ते मृत्यू समयी ६५ वर्षाचे होते.

त्यांच्या मागे पत्नी, मुलगा, मुलगी, सून,जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## द्रौपदीबाई जाधव यांचे निधन



नगर - येथील द्रौपदीबाई शांतवन जाधव (वय ८८) यांचे निधन १७ मे रोजी निधन झाले. त्या शांत मनमिळाऊ, धार्मिक स्वभावाच्या होत्या. त्यांच्या मागे दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडं, पणतु असा परिवार आहे. बीएसएनएलचे निवृत्त व अहमदनगर शहर सहकारी बँकेचे संचालक प्रदीपकुमार जाधव व पीडब्ल्युडी (विद्युत) चे सेवानिवृत्त अनिल जाधव यांच्या त्या मातोश्री होत.

## सौ.निर्मला लोढा यांचे अल्पश: आजाराने निधन



श्रीरामपूर - येथील सौ.निर्मला रमेश लोढा (वय ६७) यांचे अल्पश: आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, सुना, दिर, पुतणे जावई, नातवंडे असा परिवार आहे.

रमेश इंद्रभान लोढा यांच्या पत्नी, विलास लोढा यांच्या भावजई, राहुल व पंकज लोढा यांच्या चुलती, बेलापूररोड येथील राहुल गॅसेसचे मालक कमलेश व लोकेश लोढा यांच्या मातोश्री होत.

## पाराजी ससे यांचे आकस्मिक निधन



नगर - सेवानिवृत्त अधिकारी भारतीय थल सेना व सेवानिवृत्त अधिकारी बँक ऑफ बडोदा पाराजी गेणुजी ससे (रा. ससेवाडी, ता. जि.अ.नगर) यांचे आकस्मिक निधन झाले असुन त्यांचे अध्यात्मिक, सामाजिक क्षेत्रात उच्च कोटीचे योगदान आहे. गोसेवा, पशु, पक्षी यांच्या सेवेत त्यांचा मोलाचा वाटा होता.

त्यांच्या पश्चात पत्नी श्रीमती सुशीला, एक मुलगा सोमदत्त पाराजी ससे अधीकारी स्टेट बँक ऑफ इंडिया (नाशिक), दोन मुली कु. अनीता, कु.सवीता असा परीवार आहे.



अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने गौरवनगर फकीरवाडा येथील ड्रेनेज लाईनचे काम त्वरित चालू करण्याच्या मागणीचे निवेदन अतिरिक्त आयुक्त सौरभ जोशी यांना देताना संघटनेच्या महिला जिल्हाअध्यक्षा सुरेखाताई सांगळे, गिरीश मुळे, पूनम शेलार, नागनाथ कासार, सोनाली शेलार, सना शेख, राम चिंचोळी, नईम सय्यद, संगीता केरूळकर, सोनाली मुनोत, प्रदीप कारंडे, मझहर अली, सुनिता साळी, रिजवान पठाण, शोभा घाडगे, पुष्पा शिंदे आदी.

## ड्रेनेजचे मैलमिश्रित पाणी रस्त्यावर आल्याने दुर्गंधी

### लाईन दुरुस्त करण्याच्या मागणीसाठी नागरिकांची मनपा आयुक्तांकडे धाव

नगर - वार्ड क्रमांक ४ मधील गौरवनगर फकीरवाडा येथून मोठी ड्रेनेज लाईन गेलेली आहे. ती ड्रेनेज लाईन वारंवार तुंबत आहे व तुंबल्यानंतर त्यातील मैलमिश्रित पाणी सर्व रस्त्यावरून नागरिकांच्या दारातून वाहत आहे. या वार्डच्या विभागीय कार्यालयात वारंवार तक्रारी केल्या आहे. परंतु तक्रार केल्यानंतर सफाई कामगार तात्पुरती पट्टी टाकून पाण्याला वाट करून देतात आणि परंतू पुढील ६ ते ७ दिवसात पुन्हा ड्रेनेज लाईन पॅक होते. पुन्हा मैलमिश्रित पाणी नागरिकांच्या दारातून वाहते त्यामुळे येथे संपूर्ण दुर्गंधीचे साम्राज्य पसरले असून घरातील लहान मुले वृद्ध सतत आजारी पडत आहेत. त्यामुळे अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने गौरवनगर फकीरवाडा येथील ड्रेनेज लाईनचे काम त्वरित चालू करण्याच्या मागणीचे निवेदन अतिरिक्त आयुक्त सौरभ जोशी यांना देण्यात आले. यावेळी संघटनेच्या महिला जिल्हाअध्यक्षा सुरेखाताई सांगळे, गिरीश मुळे, पूनम शेलार, नागनाथ कासार, सोनाली शेलार, सना शेख, राम चिंचोळी, नईम सय्यद, संगीता केरूळकर, सोनाली मुनोत, प्रदीप कारंडे, मझहर अली, सुनिता साळी, रिजवान पठाण, शोभा घाडगे, पुष्पा शिंदे आदीसह प्रभागातील महिला उपस्थित होत्या.

## बालिकाश्रम रस्त्यावर चोरट्यांनी फ्लॅट फोडला

### दागिने व रोकड पळविली; सावेडी उपनगरात चोरट्यांचा धुमाकूळ सुरूच

नगर - पत्नी बाहेरगावी आणि पती कामावर गेल्यानंतर चोरट्यांनी भरदिवसा फ्लॅट फोडून २५ हजाराची रोकड, चार तोळे सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना बालिकाश्रम रस्त्यावरील बोरूडे मळ्यातील अमृत कलश रेसिडेंसीच्या बी बिल्डींगमध्ये शनिवारी (दि.२५) सकाळी १० ते दुपारी साडेतीनच्या दरम्यान घडली आहे. सावेडी उपनगर परिसरात गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर चोऱ्या, घरफोड्यांचे सत्र सुरु असून पोलिसांना मात्र या गुन्ह्यांचा तपास लावण्यात अपयश येत असल्याचे समोर आले आहे.

याप्रकरणी रखमा बालाजी सुंबे (वय ५७) यांनी रविवारी (दि.२६) दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीच्या पत्नी बाहेरगावी गेलेल्या होत्या. त्यामुळे फिर्यादी हे एकटेच घरी होते. शनिवारी सकाळी १० वाजता फिर्यादी त्यांच्या फ्लॅटला कुलूप लावून नेहमीप्रमाणे जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात असलेल्या पराग बिल्डींग येथे कामावर गेले होते. दुपारी साडेतीन वाजता फिर्यादीला त्यांची पत्नी संगीता यांचा फोन आला व आपल्या घरात चोरी झाल्याचे कामावाल्या महिलेने सांगितले असल्याचे त्यांनी सांगितले.

फिर्यादी यांनी तात्काळ घरी जाऊन पाहणी केली असता त्यांना घरात चोरी झाल्याचे लक्षात आले. घरातील सामानाची उचकापाचक करून कपाटात ठेवलेली २५ हजारांची रोकड, तीन तोळ्यांची सोन्याची चेन, अर्धा तोळ्याची सोन्याची अंगठी, अर्धा तोळ्याचे सोन्याचे कानातील झुबे, अर्धा ग्रॅमची सोन्याची बाळी व अर्धा ग्रॅमचे चांदीचे करांडे असा एकूण ६६ हजारांचा ऐवज चोरीला गेल्याचे लक्षात आले.

फिर्यादी यांनी तोफखाना पोलिसांनी माहिती दिली असता पोलिसांचे पथक व डॉगस्कॉड पथक घटनास्थळी येत पाहणी केली.

या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध भा.दं. वि.कलम ४५४,३८० प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास पोलीस करत आहे.



### सावेडी उपनगरात महापालिकेच्यावतीने राबविण्यात आली 'अतिक्रमण हटाव मोहीम'

झोपटी कॅन्टीन येथील पेट्रोल पंपासमोरील भुतकरवाडी रोड भिंगार अर्बन लगत वडापाव, चहा, मावा, पान टपरी यांचे अतिक्रमण हटविण्याचे काम सुरू आहे. प्रभाग समिती एक सावेडीचे क्षेत्रीय अधिकारी राहुल साबळे, अर्जुन जाधव, अतिक्रमण पथक आदी.

## दिव्यदृष्टी दिव्यांग संस्थेस कार्यालयासाठी जागा द्यावी

### योगीराज गाडे यांचे महापालिका आयुक्तांना पत्र

नगर - दिव्य दृष्टि दिव्यांग विकास व संशोधन संस्था अहमदनगरसाठी कार्यालयीन जागा उपलब्ध करुन द्यावी अशी मागणी माजी नगरसेवक योगीराज गाडे यांनी महापालिका आयुक्तांकडे पत्राद्वारे केली आहे.

या पत्रात म्हटले आहे की, दिव्य दृष्टि दिव्यांग विकास व संशोधन संस्था अहमदनगर ही संस्था दृष्टिहीन व्यक्तींसाठी कार्यरत आहे व त्यांच्या कल्याणासाठी विविध उपक्रम राबविते. या संस्थेला कार्यालयीन जागेची अत्यंत आवश्यकता आहे, ज्यामुळे ते आपल्या कार्यात अधिक परिणामकारक होऊ शकतील. बॉम्बे प्रांतिक नगरपालिका अधिनियम, १९४९ (BPMC Act, १९४९) च्या कलम ६६ नुसार, नगरपालिकेला जनहितार्थ उपक्रम राबविण्याचा अधिकार आहे, ज्यामध्ये अशा संस्थांना कार्यालयीन जागा वाटप करणे शक्य आहे. संस्थेची उद्दिष्टे व कार्य महत्त्वाचे असल्यामुळे आपण त्यांना आवश्यक ती कार्यालयीन जागा वाटप करावी. आपल्या निर्णयाने दृष्टिहीन व्यक्तींच्या विकासासाठी मोठे योगदान होईल व अहमदनगर शहराच्या सामाजिक विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल असे गाडे यांनी म्हटले आहे.

## मराठवाड्याला मुबलक पाणी मिळण्यासाठी अकोले तालुक्यात नवीन धरण बांधण्यात यावे

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी

नगर - मराठवाडा जल आपुर्तिसाठी विशेष बाब म्हणून नगर उत्तर जिल्ह्यात अकोले तालुक्यात नवीन धरण बांधावे, अशी मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे करण्यात आली आहे.

याबाबत मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या निवेदनात नितीन थोरात यांनी म्हटले आहे की, जागतिक पातळीवरील ग्लोबल वॉर्मिंगमुळे मोठ्या प्रमाणावर पर्जन्यमान कमी झाले आहे. तसेच औरंगाबाद जिल्ह्याची लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर वाढलेली आहे व सध्या अस्तित्वात असलेल्या धरणातून नगर जिल्ह्यातील शेती जलसिंचन व पिण्याचे पाणी हे निळवंडे व भंडारदरा धरणावर अवलंबून आहे व त्याची आपुर्ती झाल्यानंतर ओवरफ्लोचे पाणी जायकवाडीकडे जात असते. उपरोक्त बाब लक्षात घेता प्रथमदर्शनी असे लक्षात येते की, नासिक, नगरच्या अतिरिक्त पाण्यावर जायकवाडीचे पाणी भरणा होते.

ज्यावेळेस जायकवाडीचे पाणी तळ गाठते तेव्हा भंडारदऱ्याचे किंवा निळवंड्याचे पाणी मराठवाड्याला सोडा म्हणून मराठवाड्यात आंदोलने व न्यायालयीन लढाया सुरू होतात. अशा परिस्थितीत नगर जिल्ह्याचे लोक पाणी सोडण्यास विरोध करतात व मोठ्या प्रमाणावर राज्यातच पाण्यासाठी दोन जिल्ह्यात युद्धजन्य परिस्थिती निर्माण होते. अशा स्वरूपाची यापेक्षा अधिक गंभीर परिस्थिती निर्माण होऊ नये म्हणून अकोले तालुक्यात योग्य त्या भौगोलिक क्षेत्राची निवड करून त्या ठिकाणी नवीन मराठवाडा धरणाची निर्मिती केल्यास मराठवाड्यास कायमस्वरूपी स्वतःचे हक्काचे पाणी पुढील १०० पिढ्यांना मिळेल. नगर-औरंगाबाद पाणी वाद कायमस्वरूपी मिटेल. अकोले तालुक्यात नवीन मराठवाडा धरणाची मंजुरी शासनाने द्यावी, अशी मागणी थोरात यांनी केली आहे.

## १६ वर्षीय युवतीला फूस लावून पळविले

नगर - नगर - सोलापूर महामार्गावर वाकोडी फाटा (ता. नगर) परिसरात राहणाऱ्या एका १६ वर्षीय युवतीला तिच्या राहत्या घरातून अज्ञात व्यक्तीने कशाचे तरी आमिष दाखवून पळवून नेले आहे. शनिवारी (दि.२५) सकाळी ११ ते सायंकाळी ७ या कालावधीत ही घटना घडली आहे.

याबाबत पिडीत युवतीच्या आईने रविवारी (दि.२६) सकाळी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांची १६ वर्षीय मुलगी शनिवारी एकटीच घरी होती. फिर्यादी या कामानिमित्त बाहेर गेलेल्या होत्या. त्या सांयकाळी घरी परतल्या असता त्यांना मुलगी घरात आढळून आली नाही. तिचा मोबाईल ही बंद होता. तिचा आजूबाजूला सर्वत्र शोध घेतला. मैत्रिणी, नातेवाईक यांच्याकडे चौकशी केली. मात्र तिचा कुठेही शोध न लागल्यामुळे तिला अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेले असल्याची तक्रार पिडीतेच्या आईने पोलिसांकडे केली. या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात इसमाविरुद्ध भा.दं.वि. कलम ३६३ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## कत्ती, सुरा, कटावणी, मिरचीपुड व दीड लाखांचे साहित्यासह रात्रीच्या अंधारात दरोड्याच्या तयारीत असलेली टोळी पकडली

नगर - रात्रीच्या अंधारात धारदार शस्त्रांसह दरोड्याच्या तयारीत असलेली सराईत दरोडेखोरांची टोळी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने रविवारी (दि.२६) रात्री पकडली आहे. या टोळीकडून कत्ती, सुरा, लोखंडी कटावणी, मिरचीपुड, २ महागडे मोबाईल, १ मोटारसायकल असे १ लाख ४७ हजार ८०० रुपयांचे साहित्य जप्त केले आहे. श्रीगोंदा तालुक्यातील वेठेकरवाडी परिसरात ही कारवाई करण्यात आली आहे.

आदिक आजगन काळे (वय ५०), समीर आदिक काळे (वय २२, दोन्ही रा. म्हसणे, ता. पारनेर) व आकाश रविंद्र काळे (वय २१, रा. गटेवाडी, ता. पारनेर) असे पकडलेल्या तिघा दरोडेखोरांची नावे आहेत. तर त्यांचे साथीदार वारुद भास्कर चव्हाण, कोक्या भास्कर चव्हाण, सतिष भास्कर चव्हाण, अजय संतोष भोसले (सर्व रा. कोळगांव, ता. श्रीगोंदा) व राहुल अर्पण भोसले (रा. म्हसणे, ता. पारनेर) असे ५ जण अंधाराचा फायदा घेवून पसार झाले आहेत.



रात्रीच्या अंधारात धारदार शस्त्रांसह दरोड्याच्या तयारीत असलेली टोळी पकडल्यानंतर त्यांच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

पोलीस अधिक्षक राकेश ओला यांनी जिल्ह्यात घडलेल्या गंभीर गुन्ह्यांची उकल करण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि.दिनेश आहेर यांना दिलेले होते. त्यानुसार पो. नि. आहेर यांनी स्थानिक गुन्हे शाखेतील उपनिरीक्षक तुषार धाकराव, पोलीस अंमलदार बबन मखरे, रविंद्र कर्डीले, मनोहर गोसावी, संतोष लोढे, देवेंद्र शेलार, फुरकान शेख, संतोष खैरे, मच्छिंद्र बर्डे, आकाश काळे, जालिंदर माने, भाऊसाहेब काळे, बाळासाहेब गुंजाळ, अमोल कोतकर, किशोर शिरसाठ व संभाजी कोतकर यांचे पथक नेमुन गुन्हे उघडकिस आणणे बाबत सुचना दिल्या होत्या.

सदर पथक जिल्ह्यातील चोरीच्या गुन्ह्यातील आरोपींची माहिती काढत असताना पो.नि.आहेर यांना शुक्रवारी रात्री गोपनीय माहिती मिळाली की, सराईत गुन्हेगार आदिक आजगन काळे हा त्याचे इतर ७ ते ८ साथीदारांसह ३ मोटार सायकलवर येवुन श्रीगोंदा तालुक्यातील वेठेकरवाडी ते पांढरेवाडी जाणारे रोडवर ओढयामध्ये थांबुन कोठे तरी दरोडा घालण्याचे तयारीत अंधारात दबा धरुन बसलेले आहेत. ही माहिती त्यांनी पथकाला सांगितली या पथकाने तेथे जावून पाहिले असता ७ ते ८ संशयित झुडपाच्या मागे दबा धरुन बसलेले दिसले. पथकाने त्यांना पकडण्याचा प्रयत्न करताच सर्वांनी पळ काढला, मात्र त्यातील तिघांना पोलिसांनी पाठलाग करून पकडले. तर उर्वरित ५ जण पसार झाले. पकडलेले तिघेही सराईत दरोडेखोर आहेत. त्यांच्यावर बेलवंडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### केसांच्या वाढीसाठी

केसांच्या नियमीत वाढीसाठी एका अंड्यातील पांढऱ्या भागामध्ये एक टिस्पून ऑलिव्ह ऑईल मिसळावे. मिश्रण चांगले एकजीव होईपर्यंत ढवळा. त्यानंतर हे मिश्रण टाळूला व केसांना लावा. १५ ते २० मिनिटांनंतर सौम्य शॅम्पू लावून थंड पाण्याने केस धुवा.

## पाककला

### आलू-मटार पॅटीस

**साहित्य** - उकडून सोललेल्या बटाट्याचा लगदा २ वाट्या, मटार दाणे १ वाटी, चवीप्रमाणे मीठ, ३ हिरव्या मिरच्या जाडसर वाटून, थोडी चिरलेली कोथिंबीर, १ टी स्पून आले-लसूण वाटून, ओल्या नारळाचा खव, ब्रेड क्रंब्ज (ब्रेडचा चुरा).

**कृती** - मटार दाणे वाफवून घ्यावेत. तेल तापवून त्यात जिरे व हळद घालावी. आले, लसूण व मिरची पेस्ट घालावी. त्यात वाफवलेला मटार व चवीप्रमाणे मीठ घालावे. थोडी धने जिरे पावडर घालावी. आले, खोवलेले खोबरे व कोथिंबीर घालावी. कोरडी उसळ तयार करून गार करावी. बटाट्यांच्या लगद्यात मीठ घालून चांगले मळावे. त्यात चिमूटभर हळद घालावी.

या मिश्रणाचा लहान लिंबाएवढा गोळा घेऊन त्याला वाटीसारखा आकार देऊन त्यात मटारची उसळ भरावी. मटारची उसळ थोडी हाताने कुस्करून घ्यावी. बटाट्याची ही सारण भरलेली वाटी पुन्हा हाताने बंद करून गोल आकार द्यावा. ब्रेड क्रंब्जमध्ये घोळवून गरम तेलात खमंग तळावी किंवा फ्रायपॅनमध्ये थोडे तेल घालून पॅटीसला चपटा आकार देऊन शॅलो फ्राय करावे.

## सौंदर्य

### निरोगी केसांसाठी

* लिंबूची साल हाताच्या कोपरांवर चोळल्यास कोपरे स्वच्छ होतात.
* केसांमध्येही लिंबूची साल चोळून अंघोळ केल्यास केस घनदाट, निरोगी आणि चमकदार बनतात.
* आवळा, रिठा व शिकेकाईची पेस्ट बनवून केसांना लावा व नंतर धुवा-ॲलोव्हेरा जेल केसांना १५ मिनिटं लावून ठेवा व धुवा.

## सल्ला

फ्रिज नसल्यास दूध सोडियम बायकार्बोनेट टाकून उकळवावे. ते फाटत किंवा खराबही होत नाही.

## वास्तू

व्यसनाच्या समस्या- उत्तर-पूर्व म्हणजे आग्नेय भागात बांधकाम, रंग, माळा, पाणी-वीज-गॅस यांच्या अस्तित्वामुळे व्यसनांचा कुटुंबात शिरकाव होतो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

## दैनिक पंचांग

**मंगळवार, दि. २८ मे २०२४**

---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, वैशाख कृष्णपक्ष, उ.षा.०९।३३

सूर्योदय ०६ वा. २५ मि. सूर्यास्त ०६ वा. २९ मि.

**राशिभविष्य-**

**मेष** : शत्रुपक्ष हावी राहील. एखाद्या चुकीला पुन्हा करु नका. मन रमणार नाही. विश्वास कमी राहील. व्यर्थ ताण जाणवेल. खाणे-पीणे काळजीपूर्वक करा.

**वृषभ** : पारिवारिक वाद वाढतील. खर्च होईल. अडकलेल्या कामात सुधारणा होईल. निश्चितेने काम करा. बातमी मिळेल. शिक्षण संबंधी विषयांमध्ये काळ अनुकूल ठरेल.

**मिथुन** : मार्ग प्रशस्त होईल. अडकलेली कामे पूर्ण झाल्याने आनंद वाटेल. साथ लाभेल. व्यक्तिगत कामात उन्नति होईल. ोणतेही आवेदन देण्यासाठी उत्तम वेळ. मित्रांचा पाठिंबा राहील. मन प्रसन्न राहील.

**कर्क** : कायदेशीर कामात आत्मविश्वास कमी राहील. आपल्या पावलांच्या खुणा दुसऱ्यांना मार्गदर्शक ठरण्याचा संभव आहे. महत्वपूर्ण वार्ता मिळाल्याने मन प्रसन्न राहील.

**सिंह** : अडकलेला पैसा मिळेल. गूढ अनुसंधान करणार्यांसाठी शुभ. गैरसमज दूर होतील. गुंतवणूकीतून लाभ होण्याची शक्यता. नोकरीपेशा व्यक्तींना पाठबळ मिळेल. आरोग्य उत्तम राहील. अचानक खर्च वाढेल. आजारात खर्चाची शक्यता.

**कन्या** : आपल्या विवेक बुद्धिच्या उलट काम झाल्याने हानि होऊ शकते. नियंत्रण ठेवा. आपल्या इच्छा आकांक्षा पूर्ण होतील. अपत्य आणि इतर विषयांपासून आनंद प्राप्ति होईल. कामावर प्रभाव पडेल.

**तूळ** : आपल्या प्रयत्नाने उन्नति कराल. धनलाभ होईल. वरिष्ठांची मर्जी राहील. आपल्या प्रयत्नांमुळे व्यापारात वृद्धि होईल. व्यापार व्यवसायात अनुकूल वातावरण राहील. अधिकारी वर्गाच्या हातात अडकलेली कामे पूर्ण होतील.

**वृश्चिक** : नवीन कामांना चालना मिळेल. आपल्या यशाचा मूळ मंत्र कोणत्याच कामाला अशक्य न समजणे आहे. यश मिळणार नाही. अनपेक्षित फायदा करून देणाऱ्या काही घटना घडतील. आर्थिक विषयांमध्ये सावधगिरी बाळगा.

**धनु** : आपल्या कामांची समाजात चर्चा होईल. लाभाच्या संधी. नवीन ओळखी संभवतात. वेळेच महत्व समजा. प्रेम प्रकरणात दोघांसाठी आजचा दिवस चांगला आहे. आरोग्य उत्तम राहील.

**मकर** : आपल्या बुद्धि आणि तर्काने कार्यात यशाची शक्यता. कामाला वाव मिळेल. आपले निर्णय, विचार दुसऱ्यांवर थोपू नका. लेखन कार्यास प्रगति होईल. आरोग्य उत्तम राहील.

**कुंभ** : संपत्तीच्या कामात यश मिळण्याचे योग. मनात नवीन कल्पना सुचतील. आपल्या महत्वाकांक्षेमुळे यश मिळू शकेल. वेळ सत्कारणी लागेल. आज रात्री आपल्या करीयरशी संबंधित सर्व बाबी स्पष्ट होतील.

**मीन** : वातावरण उत्साहवर्धक राहील. सामाजिक मान-सन्मान वाढेल. व्यापारिक लाभ आणि सुख-समृद्धि वाढेल. सामाजिक यश. नवीन कार्य सुरू करू नका. सुख-शांतीचे वातावरण राहील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

## शब्दगंध क्र. ६९३२

सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | | ■ | ५ | ६ |
| ७ | | | | ■ | ८ | | |
| | ■ | | ■ | ९ | | | ■ |
| ■ | १० | | ११ | ■ | ■ | १२ | १३ |
| १४ | | ■ | १५ | | १६ | ■ | |
| | ■ | १७ | ■ | ■ | १८ | १९ | |
| २० | २१ | | | ■ | २२ | | |
| २३ | | | ■ | २४ | | ■ | ■ |

**शब्दगंध क्र. ६९३१ चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सौ | र | ■ | प | सं | त | ■ | ब |
| र | ग | ड | ■ | ग | ळ | स | र |
| भ | ■ | रा | ख | ण | ■ | ल | ग |
| गां | डी | व | ■ | क | ल | मा | डी |
| गु | ■ | व | ■ | ■ | ता | न | ■ |
| ली | ला | ■ | वा | डा | ■ | खा | स |
| ■ | व | स | न | ■ | म | न | न |
| पा | णी | दा | र | ■ | द्य | ■ | ई |

**आडवे शब्द :-** १) चौकशी; परामर्ष ५) उपहास; फजिती; हुर्यो ७) गायीचे मादी वासरू ८) मत्सर; द्वेष ९) अंथरण्याचे एक जाड वस्त्र १०) देव; देवता १२) ताडकन फुटणारी एक वस्तू १४) आफ्रिका खंडातील एक देश १५) सूर्योदयापूर्वीचा अंधाराचा काळ; प्रभात १८) विशिष्ट द्रव्यसंख्या; अमाउंट २०) श्रम; कष्ट; परिश्रम २२) फळा; तक्ता; बोर्ड २३) भांडण सोडविणारे त्रयस्थ लोक; पंच मंडळ २४) घाण; विष्ठा

**उभे शब्द :-** १) वृद्धी; वाढ; प्रगती २) चालण्याची ढब; तऱ्हा; चारित्र्य ३) बारीक झणझण; गर्दी करून; पुष्कळ ४) भुगा; भुकटी ५) एकसारखे लक्ष लावून; चकितपणाने ६) ऊस, फळ वगैरेतील द्रव; स्वाद; गोडी ८) वर्तमान दिवस; चालू दिवस १०) दुर्दशा; परवड ११) बारा वर्षांचा काळ; खडतर व्रत १३) बोलाचाल; भांडण १४) तगमग; इकडचे तिकडे व तिकडचे असा प्रकार १६) कवच; साल; आवरण १७) प्रमाणपत्र; सरकारी शिक्कापत्र १९) ओढा; रोख; झोक २१) जिवंत राहण्यासाठीचा एक घटक

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : पाप हे पाप्याला कधीही शांतपणे झोपू देत नाही. - **प्रेमचंद.**

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### हवेचं वजन किती आहे?

काय रे, काय चेष्टा करुन राहिलायत हवेचं आणि वजन अहो, ती हवा तर आपल्याला दिसतही नाही. इतकी हलकी असते, तिचं काय वजन असणार आहे पण कितीही हलकी असली तरी तिलाही वजन असतंच. त्याशिवाय का त्याच हवेचा दाब आपल्याला जाणवत राहतो. एखाद्या पत्र्याच्या डब्यातून सगळी हवा काढून घेऊन तो निर्वात केला तर बाहेरच्या हवेचा दाब त्या डब्याची अवस्था पालापाचोळ्यासारखी करतो. त्याला वेडावाकडा दाबून टाकतो याचा अनुभव आपण घेतोच की मग त्या हवेला वजन नाही अस कस म्हणता येईल.

तरीही हा प्रश्न व्यवस्थित विचारला गेलेला नाही. हवेच वजन म्हणजे किती हवेच वजन असा प्रतिप्रश्न खरं तर आपण करायला हवा. सगळ्या हवेच वजन सांगण तसं कठीणच आहे. तेव्हा आपण, एक लिटर हवेच वजन किती असा प्रश्न सुधारित स्वरुपात विचारायला हवा. खर तर तेही सांगण तसं सोपं नाही. कारण हवेचे घटक निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळे असू शकतात. काही ठिकाणची हवा दमट असते. तिथ हवेत बाष्पाचं किंवा पाण्याच्या वाफेचं प्रमाण जास्त असतं. काही ठिकाणी प्रदूषण झाल्यामुळे कार्बन डाय ऑक्साईड वायूचं प्रमाण जास्त असते. त्यामुळे मग निरनिराळ्या ठिकाणी एक लिटर हवेच वजनही निरनिराळं असतं.

तरीही आपण समुद्रसपाटीवरच्या सर्वसाधारण आणि प्रदूषणविरहित हवेचा विचार करुया. या हवेत २१ टक्के ऑक्सिजन, ७८ टक्के नायट्रोजन, ०.०३ टक्के कार्बन डाय ऑक्साईड हे वायू मुख्यत्वे असतात. त्याशिवाय पाण्याची वाफ, हायड्रोजन, हेलियम, अर्गान, सल्फर डाय ऑक्साईड, निऑन वगैरे वायूही असतात. पण त्याचं प्रमाण अत्यल्प असल्यामुळे त्यांचा हवेच्या वजनात फारसा सहभाग नसतो. त्यामुळे आपण त्यांच्याकडे दुर्लक्ष केलं तरी फरक पडणार नाही.

वायूंचा एक गुणधर्म असा आहे, की २२.४ लिटर वायूमध्ये $६\times१०२३$ इतके रेणू असतात. या संख्येला ॲव्होगॅड्रो संख्या असं म्हटलं जातं. अणि इतक्या रेणूंचं वजन त्या पदार्थाच्या अणुभाराइतक ग्रॅम असतं. म्हणजे तितक्या ऑक्सिजनच्या रेणुंचं वजन ३२ ग्रॅम भरेल, नायट्रोजनचं वजन २८ ग्रॅम भरेल. हवेत असलेलं या वायूंचं प्रमाण ध्यात घेतलं तर गणित करुन आपण २२.४ लिटर हवेचं वजन २८.८९ ग्रॅम भरतं. तेव्हा १ लिटर हवेचं वजन १.२९ इतकं भरेल. अर्थात, जसजसं आपण उंचावर जातो तसतशी हवा विरळ होते. त्यामुळे तिथं एका लिटर हवेमध्ये असलेल्या वायूंच्या रेणूंची संख्याही कमी होते. साहजिक तिथं एक लिटर हवेचं वजन कमीच भरेल.

### माकडाचा उपद्व्याप

काही सुतार लोक नदीकाठी असलेले एक झाड कापत होते. अर्धे लाकूड कापून होताच कापलेल्या लाकडात पाचर ठोकून सुतारमंडळी जेवणासाठी घरी गेली. जवळच्याच झाडावर एक माकड सुतारांची करामत गमतीने पाहत होते. सुतार मंडळी जेवायला जाताच त्यांची गंमत करावी, या हेतूने माकड खाली उतरुन लाकडाजवळ गेले आणि लाकडावर बसून त्याने सुतारांनी ठोकलेली पाचर उपसून काढली.

त्याबरोबर लाकूड मिटले आणि नेमकी त्यात माकडाची शेपटी चांगलीच अडकली. माकड शेपटी ओढून काढण्याचा प्रयत्न करु लागले, पण ती काही निघेना.

इतक्यात सुतार मंडळी तेथे आली. त्यांनी माकडाचा प्रताप पाहून त्याला चांगले बदडून काढले. या माराने माकड जागीच मरुन पडले.

**तात्पर्य** : नसत्या उठाठेवी केल्यास पश्चातापाची पाळी येते.

## जीवन चक्र



पुरुषांच्या टेस्टीजमध्ये दोष असेल तर जननेंद्रियाची वाढ होत नाही. शुक्रजंतू अजिबात तयार होत नाहीत किंवा अल्प प्रमाणात तयार होतात किंवा शुक्रजंतूची हालचाल मंद असते. इंद्रियाला ताठरता येत नाही. पुरुषांमधील पौरूषत्व या हार्मोन्सवर अवलंबून असते. शब्द से जुड़ने पर हम एक ऐसी अवस्था में पहुँच जाते हैं, जिसमें हमें प्रभु के सिवाय कोई नज़र नहीं आता। जब हम किसी और से मिलते हैं, तो वे हमें अपने ही लगते हैं, उनमें हमें प्रभु रूप के दर्शन होते हैं। इसीलिए दयाल पुरुष संत दर्शनसिंह जी महाराज ने फ़रमाया

**गले लगा लो हर इंसान को कि अपना है**
**चलो तो राहगुज़ारों में बाँटते हुए प्यार**

- मताओ नूर, ग़ज़ल-३३

किसी को हम तभी गले लगा सकते हैं, जब हम उसे अपना समझें। अपना तभी लगेगा जब हम उसमें प्रभु का वही रूप देखें, जो हम अपने आप में देख रहे हैं। जब हम भजन-ध्यान के लिए बैठते हैं और अपने अन्दर शब्द को सुनते हैं, प्रभु की ज्योति के दर्शन करते हैं, तो हमें यह यक़ीन हो जाता है कि प्रभु हमारे अन्दर बसा हुआ है और जब हम औरों से मिलते हैं, तो उनके अंतर में भी हमें प्रभु के दर्शन होते हैं। जब हमें दूसरों में प्रभु के दर्शन होंगे, तो उन्हें भी हम गले से लगा लेंगे। यही हमें गुरु अर्जनदेव जी महाराज समझा रहे हैं कि जब हम शब्द के साथ जुड़ते हैं, तो फिर हम मदहोशी में आ जाते हैं। २४ घंटे, दिन-रात महदोशी में रहते हैं, जैसे कि गुरुवाणी में आया है, नाम खुमारी नानका चढ़ी रहे दिन-रात। यही गुरु अर्जनदेव जी महाराज फ़रमा रहे हैं कि सदा-सदा के लिए वह खुमारी हम पर चढ़ जाती है और जिस मक्सद के लिए हम यहाँ आए हैं, जिस लक्ष्य के लिए हमारा इस शरीर में जन्म हुआ है, वह पूरा हो जाता है। आगे गुरु अर्जनदेव जी फ़रमा रहे हैं :

**जनम जनम का विछुड़िआ मिलिआ ।।**
**साध क्रिपा ते सूका हरिआ ।।**

जन्म-जन्म से जो हमारा बिछोड़ा परमात्मा से हो गया है, जिसके कारण हम कमज़ोर हो गए हैं।

**(कृपाल आश्रम, अहमदनगर)**

## शुद्ध जीवन जीने के मंत्र

मिक्स फसल पद्धति में अलग-अलग पौधे एक दूसरे को निरोगी और शक्तिशाली बनाने में सहयोगी बनते हैं। अगर हमने जमीन को शक्तिशाली बनाया है, पर्यावरण निर्माण भी कर रहे हैं फिर भी अचानक वातावरण बदलने से कोई कीट या बीमारी आती है तो उसके लिए निम्नलिखित कीटनिरोधक और फफूंदी-निरोधक दवाइयों का इस्तेमाल करना आवश्यक है। इन दवाइयों के साथ हम योग के प्रयोग करते हैं तो कीट रोकने में अच्छी सफलता मिलती है। **फसल संरक्षण - १) दशपर्णी दवाई बनाने की विधि :** १. कड़वे नीम के पत्ते - ५ किलो २. कन्हेर के पत्ते - २ किलो ३. पपीते के पत्ते - २ किलो ४. करंजी के पत्ते - २ किलो ५. पार्थेनियम (सफेद फूल) घास के पत्ते - १ किलो ६. धतूरा के पत्ते - २ किलो ७. शरीफा (सीताफल) के पत्ते - ३ किलो ८. रूई के पत्ते - २ किलो ९. एरंडी के पत्ते - २ किलो १०. गुडवेल के पत्ते - २ किलो ११. हरी मिर्च कुटी हुई - २ किलो इन पत्तों में से एक दो प्रकार के पत्ते नहीं मिलेंगे तो भी चल सकता है। सीमेंट या प्लास्टिक की टंकी में २०० लीटर पानी में मिलाकर ३० से ४० दिन तक सड़ने दें। टंकी का मुख मोटे कपड़े से बांधकर छांव में रखें। प्रतिदिन मिश्रण को दो बार डंडे से घड़ी की दिशा में हिलायें, ३०-४० दिन बाद उसे छानकर, १५ लीटर पानी में एक या दो लीटर (कीट की तीव्रता देखकर) मिश्रण मिलाकर, कोई भी फसल पर किसी भी प्रकार की कीट के लिए छिड़के। एक बार तैयार हुआ यह मिश्रण ६ मास तक इस्तेमाल कर सकते हैं। इस मिश्रण में २ प्रतिशत प्रति लीटर गोमूत्र मिलाना आवश्यक है।

**२) नीम अर्क :-** ५ किलो कड़वे नीम के बीजों को कूटकर, १० लीटर गोमूत्र में रातभर भिगो दें और इसमें ५०० ग्राम हरी मिर्च कूटकर मिलायें, इससे नीम अर्क अधिक प्रभावी बनता है। साथ ही एक लीटर पानी में २०० ग्राम कोई भी वाशिंग पाउडर भिगो दें। दूसरे दिन यह दोनों मिश्रण हिलाकर छान लें और २०० लीटर पानी में मिलायें। जिस दिन इस्तेमाल करना है उससे दो दिन पहले इसे तैयार करें। इससे कई प्रकार के कीट और फफूंदी जैसी बीमारी पर भी नियंत्रण होता है।

**३) लिफ माइनर (नाग अली) -** नियंत्रण के लिए :- २५० मिली. देशी गाय का छाछ, ५० ग्राम नींबू सत्व, १०० ग्राम गुड़, १०० मिली. इमली का जूस, १० ग्राम कपूर, १५ लीटर पानी में मिलाकर स्प्रे करें। इससे कई प्रकार के कीट भाग जाते हैं। विशेष लिफ माइनर के लिए यह बहुत ही प्रभावी दवा है।

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**


## हसा आणि शतायुषी व्हा!

**पोलीस :** काय रे,
कुठे चाललाय एवढ्या रात्री?
**बेवडा :** प्रवचन ऐकायला!
**पोलीस :** कोणत्या विषयावर प्रवचन आहे?
**बेवडा :** दारुपासून होणारे दुष्परिणाम
**पोलीस :** एवढ्या रात्री कोण देत प्रवचन
**बेवडा :** माझी बायको!!!

## रविंद्रनाथ टागोरांच्या कविता

(मूळ इंग्रजीत)

मी तुला अर्धवट अवस्थेत झोपलेल्या
तान्ह्या बाळाप्रमाणे पाहिलयं
जे बाळ आपल्या आईकडे
शांत पहाटेच्या वेळी बघते, हसते
व पुन्हा झोपते



**मूळ इंग्रजी कविता - रविंद्रनाथ टागोर**
**मराठी अनुवाद - अरविंद ब्राम्हणे,**
भिंगार मो. ९४०३७३४२८१

## स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

**२) प्रजनन संस्थेतील विकृती :** स्त्रियांचा योनिमार्ग, गर्भाशयमुख, गर्भाशयाचा आकार, बीजवाहिनी नलिका, स्त्रीबीजकोष हे प्राकृत अवस्थेत असायला हवे. पुरुषांमध्ये वृषणग्रंथी, वृषणकोषांनी शुक्रजंतू तयार करणे ही अवस्था प्राकृत असणे आवश्यक असते. यापैकी कोणत्याही अवयवात विकृती असेल तर गर्भधारणा होत नाही.

**वंध्यत्वाचे प्रकार - १) प्राथमिक वंध्यत्व** (Primary Infertility) : कधीच गर्भधारणा झालेली नसण्याला प्राथमिक वंध्यत्व असे म्हणतात.

**२) दुय्यम वंध्यत्व** (Secondary Infertility) : एकदा गर्भधारणा झाल्यानंतर काही कारणास्तव अपत्य प्राप्ती न होणे याला दुय्यम वंध्यत्व असे म्हणतात.

**वंध्यत्वाची तपासणी :** वंध्यत्वाची तपासणी करण्यासाठी डॉक्टरांकडे जावे. पती-पत्नी दोघेही तपासणीस आले, तर वंध्यत्वाचे कारण लगेचच समजू शकते. वंध्यत्वाच्या कारणांचा शोध घेण्यासाठी व उपचारनिश्चिती करण्यासाठी डॉक्टरांना दोघांचीही शारीरिक तपासणी करणे गरजेचे असते. दांपत्याला विश्वासात घेऊन त्यांना लैंगिक शारीरिक संबंधामध्ये काही अडचण आहे का याची विचारपूस करावी लागते. तसेच पतीला काही व्यसन असल्यास ते सोडून देण्यास सांगितले जाते. त्यानंतर रक्तगट, रक्ताचे प्रमाण, रक्तातील साखरेचे प्रमाण, गुप्तरोग अशा दोघांच्याही प्राथमिक तपासण्या कराव्या लागतात.

**वीर्य तपासणी :** वीर्यामध्ये शुक्रजंतूंचे प्रमाण प्राकृत आहे की नाही, त्यांची हालचाल चांगली आहे की नाही यासाठी वीर्य तपासणी करतात. **लघवी तपासणी :** यामध्ये जंतुसंसर्ग आणि मधुमेह आहे का याचे निदान करता येते.

**अल्ट्रासोनोग्राफी (सोनोग्राफी तपासणी)** : यामध्ये स्त्रीच्या गर्भाशयामधील विकृती समजते. तसेच बीजकोषांमध्ये बीजनिर्मिती वेळेवर होते की नाही, बीज परिपक्व झाल्यानंतर ते फुटते की नाही हे सोनोग्राफी तपासणीमधून समजते. गर्भधारणेसाठी अचूक दिवस ठरवण्यासाठी अल्ट्रासोनोग्राफी उपयुक्त ठरते.

**हिस्टेरोसाल्पिंगोग्राफी :** ही तपासणी बीजवाहक नळ्या उघड्या आहेत की नाही, गर्भाशयाच्या पोकळीत काही दोष आहे का, गर्भाशयाला पडदा आहे का याचे निदान करण्यासाठी करतात. गर्भाशयमुखातून अपारदर्शक द्रव्य गर्भाशयात भरतात. 'क्ष' किरण तपासणी करून गर्भाशय, गर्भनळ्यांची अवस्था त्यामुळे समजते. पुरुषांच्या टेस्टीजमध्ये दोष असेल तर जननेंद्रियाची वाढ होत नाही. शुक्रजंतू अजिबात तयार होत नाहीत किंवा अल्प प्रमाणात तयार होतात किंवा शुक्रजंतूची हालचाल मंद असते. इंद्रियाला ताठरता येत नाही. पुरुषांमधील पौरूषत्व या हार्मोन्सवर अवलंबून असते. (क्रमशः)

**- डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# बंगडीवाला ॲग्रो प्रोडक्ट्स प्रा. ली. चे डायरेक्टर जितेंद्र बिहाणी व श्रद्धा बिहाणी यांना राज्यस्तरीय राजीव गांधी कृषीरत्न पुरस्कार

नगर – भारताचे माजी पंतप्रधान स्व.राजीव गांधी यांच्या स्मृती दिनी राजीव गांधी कृषी विज्ञान प्रतिष्ठान अमरावती यांच्या मार्फत प्रगतशील कृषी रत्नांचा तसेच शेतकरी बंधुचा सन्मान राज्यस्तरीय राजीव गांधी कृषी रत्न पुरस्कार देऊन करत असते. सलग १८ वर्षे अविरतपणे हा सन्मान प्रतिष्ठानच्या वतीने महाराष्ट्रातील कृषी क्षेत्रातील आधुनिक शेतीला नवीन तंत्रज्ञानाची जोड देऊन उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शेतकरी बंधूना प्रदान केला जातो. या वर्षी प्रतिष्ठानच्या निवड समितीने संपूर्ण महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन समक्ष पाहणी करून १५ कृषी रत्नांची निवड केली. यापैकी वडाळा बहिरोबा, ता. नेवासा येथील बंगडीवाला ॲग्रो प्रोडक्ट्स प्रा. ली. या कंपनीला हा पुरस्कार २६ मे रोजी प्रदान करण्यात आला.





यावेळी राजीव गांधी कृषी विज्ञान प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रकाश साबळे, शेतकरी निवड समितीच्या अध्यक्षा सौ. पौर्णिमाताई सवाई, सदस्य डॉ. दिलीप काळे, राहुल तायडे, दत्ता किटुकले, निलेश उभाड, गोपाल महाले, शिवा पाटील भोंगडे आदी मान्यवरांच्या हस्ते जितेंद्र बिहाणी आणि सौ. श्रद्धा बिहाणी यांना कृषी रत्न पुरस्कार, मानपत्र व स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी प्रकाश साबळे मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, बिहाणी परिवाराने चिकाटी, सातत्य, आणि प्रामाणिकतेच्या जोरावार उभा केलेला कृषी पूरक व्यवसाय महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी आहे. तसेच जितेंद्र बिहाणी यांच्या सारख्या दूरदृष्टी ठेऊन आणि सर्वांना सोबत घेऊन काम करणाऱ्या अभ्यासू व्यक्तिमत्वाला हा पुरस्कार आम्ही प्रदान करत आहे याचे आम्हाला आणि निवड समितीला खूप मोठे समाधान आहे.




बंगडीवाला ॲग्रो प्रोडक्टस् प्रा.लि.चे डायरेक्टर जितेंद्र बिहाणी व सौ. श्रद्धा बिहाणी यांना राज्यस्तरीय राजीव गांधी कृषीरत्न पुरस्कार प्रदान करताना प्रकाश साबळे, सौ.पौर्णिमाताई सवाई, डॉ. दिलीप काळे आदी

निवड समितीच्या अध्यक्षा आणि ग्रामगिताचार्य जिजामाता कृषी भूषण पुरस्कार प्राप्त महिला शेतकरी सौ. पौर्णिमाताई सवाई यांनी अस्सल गीर गायी जातीच्या काऊ कार्ट या दुग्ध उत्पादना करिता श्री. बिहाणी यांचे कौतुक केले.

जितेंद्र बिहाणी बोलतांना म्हणाले की, या पुरस्काराने आमच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे आणि आमचा उत्साह, आनंद आणि आमची प्रतिष्ठा यामुळे नक्कीच द्विगुणित झाली आहे. या पुरस्काराचे खरे श्रेय हे बंगडीवाला ॲग्रो प्रो. प्रा. ली. कंपनीतील सर्व कर्मचारी आणि सहकाऱ्यांना देत आहे.

या कार्यक्रमाच्या प्रसंगी संपूर्ण बिहाणी (बंगडीवाला) परिवार तसेच वडाळा बहिरोबा येथील सरपंच ललित मोटे पाटील, उपसरपंच सचिन मोटे पाटील, सुरेश मोटे पाटील, निखिल मोटे पाटील, तंटा मुक्ती अध्यक्ष ॲड नानासाहेब मोटे पाटील, माजी उप सरपंच राहुल मोटे पाटील, मुळा सहकारी साखर कारखाना माजी चेअरमन भाऊसाहेब मोटे, दिलीप मोटे पाटील, सुनील मोटे पाटील, उमेश पतंगे, ह.भ.प. सूडके महाराज तसेच टच फौंडेशनचे गौतम मुनोत आणि सौ.सुमंगला मुनोत उपस्थित होते.

तसेच धीरज डागा, सागर बिहाणी, अभिजीत सारडा, सचिन भंडारी, अमोल रोडे, अभिजीत पाडळकर रणजित शिंदे, अभिषेक बिहाणी, अतुल पाडळकर, सुरज लोंढे, निलेश जरे, संतोष काटकर, रंगनाथ खंडागळे, युवराज सुरम, कंपनीतील सर्व कर्मचारी वृंद तसेच पंचक्रोशीतील शेतकरी आणि ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिपक परदेशी आणि अभिजीत पाडळकर यांनी केले.

# दि अंबिका महिला बँकेच्या शंभर कोटी ठेवीचा टप्पा पूर्ण


प्रा. मेधाताई काळे


ॲड.सौ.शारदा लगड


सौ. शोभना चव्हाण

नगर – अंबिका महिला बँकेने १०० कोटीच्या ठेवीचा टप्पा नुकताच पूर्ण झाला आहे. आज बँकेचे २५,००० हून अधिक ग्राहक असून त्यांचे सार्थ विश्वासामूळेच बँकेचा हा टप्पा पूर्ण झाल्याची माहिती बँकेच्या संस्थापिका प्रा. मेधाताई काळे यांनी दिली.

त्यापुढे म्हणाल्या की, ॲड. सौ. शारदा लगड यांचे अध्यक्षतेखाली गतवर्षी बँकेचा एकूण व्यवसाय १३ कोटीने वाढून तो १६२ कोटींचा झालेला आहे. बँकेच्या एकूण ठेवी १०० कोटी २९ लाख व कर्ज वितरण रू. ६२ कोटी झालेले आहे.

मागील वर्षी बँकेस एकूण १ कोटी १७ लाख निव्वळ नफा झालेला आहे. बँकेचा सी. आर. ए. आर. २३.१५%, नक्त एन.पी.ए. ०% आणि बँकेस ऑडिट वर्ग अ मिळालेला आहे. रिझर्व बँकेचे फायनान्शिअल साउंड ॲण्ड वेल मॅनेजमेंटचे (FSWM) चे सर्व निकष पूर्ण करत आहे.

बँकेने मोबाईल बँकिंग, ए.टी.एम., यु.पी.आय., फोन पे, गुगल पे व इतर सेवा ग्राहकांसाठी उपलब्ध करून दिलेली आहे. बँकेने सोने तारण कर्जाची मर्यादा वाढवलेली आहे. ठेवीचे व कर्जाचे व्याज दर संतुलित केले असून त्याचा लाभ ग्राहकांनी घ्यावा असे आवाहन बँकेच्या उपाध्यक्षा सौ. शोभना चव्हाण व संचालक मंडळाने केलेले आहे.

# चौंडी येथील जयंती कार्यक्रमास केंद्रीय मंत्री रामदास आठवले येणार

## आरपीआयच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना उपस्थित राहण्याचे आवाहन



नगर – पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त चौंडी (ता. जामखेड) येथे शुक्रवारी (दि.३१ मे) होणाऱ्या जयंती उत्सव कार्यक्रमासाठी व अभिवादन करण्यासाठी केंद्रीय मंत्री रामदास आठवले येणार आहे. या कार्यक्रमासाठी नगर दक्षिणमधून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) चे पदाधिकारी व कार्यकर्ते जाणार आहेत.

ना. रामदास आठवले सकाळी १० वाजता मुंबईहून हेलिकॉप्टरने चौंडी येथे आगमन होणार आहे. यानंतर ते जिल्ह्यातील सर्व पदाधिकाऱ्यांशी संवाद साधणार आहे. ११ वाजता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती कार्यक्रमात ते उपस्थित राहणार आहेत.

यावेळी आरपीआय पक्षाचे संपर्कप्रमुख तथा राज्य उपाध्यक्ष श्रीकांत भालेराव, राज्य उपाध्यक्ष विजय वाकचौरे, राज्य सचिव राजाभाऊ कापसे, राज्य उपाध्यक्ष बाळासाहेब गायकवाड, राज्यसचिव दीपक गायकवाड, विभागीय अध्यक्ष भीमा बागुल, उत्तर जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात, शहर जिल्हाध्यक्ष किरण दाभाडे, युवक जिल्हाध्यक्ष विवेक भिंगारदिवे आदी उपस्थित राहणार आहेत.

चौंडी येथील कार्यक्रम संपल्यानंतर ते जिल्हाध्यक्ष सुनिल साळवे यांच्या नान्नज (ता. जामखेड) येथील निवासस्थानी भेट देणार आहे. यानंतर ते करमळा मार्गे पंढरपूरला रवाना होणार आहेत. जिल्ह्यातील रिपब्लिकन पक्षाच्या सर्व नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांना चौंडी येथे सकाळी १० वाजता उपस्थित रहाण्याचे आवाहन दक्षिणचे जिल्हाध्यक्ष सुनिल साळवे व जामखेड तालुकाध्यक्ष बाळासाहेब शिंदे यांनी केले आहे.

# ऑईल वेचक कष्टकऱ्यांचे पर्यावरण दिनी धरणे आंदोलन

## पर्यावरण रक्षणाचे काम होत असताना देखील प्रशासकीय व्यवस्थेकडून अडवणुक

नगर – शहरातील काळे ऑइल वेचक कष्टकऱ्यांच्या प्रश्नावर वापरलेले ऑईल वेचक कष्टकरी पंचायतचे महाराष्ट्र राज्याचे कार्याध्यक्ष नितीन पवार यांची भेट घेऊन चर्चा करण्यात आली. जिल्ह्याचे प्रतिनिधी विकास उडानशिवे यांनी ऑइल वेचक कष्टकऱ्यांचे प्रश्न मांडून काळे ऑइल वेचक कष्टकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध पर्यावरण दिनी ५ जून रोजी पवार यांच्या नेतृत्वाखाली सर्वानुमते जिल्हाधिकारी कार्यालया समोर धरणे आंदोलन करण्याचे जाहीर केले. यावेळी विजय नेटके, अशोक साबळे, बाबासाहेब सरोदे, संजय लोखंडे, अजय नेटके, विठ्ठल कांबळे, सुनील ससाणे उपस्थित होते.



शहरातील काळे ऑइल वेचक कष्टकऱ्यांच्या प्रश्नावर वापरलेले ऑईल वेचक कष्टकरी पंचायतचे महाराष्ट्र राज्याचे कार्याध्यक्ष नितीन पवार यांची भेट घेऊन चर्चा करण्यात आली.

संघटनेचे सभासद असलेले शहरातील काळे ऑइल वेचक कष्टकरी वापरलेले ऑइल गोळा करण्याचे काम करतात. मोटरसायकल, मोटारी, ट्रक इत्यादी पेट्रोल, डिझेलवर चालणाऱ्या वाहनांमध्ये वंगण ऑइल वापरले जाते. ठराविक किलोमीटर किंवा ठराविक कालावधी झाल्यावर हे ऑइल बदलावे लागते. या गाड्यांचे बदललेले ऑइल गॅरेज चालक एका ड्रममध्ये गोळा करतात. ऑइल वेचक हे काळे ऑइल सायकल, मोटरसायकल, छोटे टेम्पो याद्वारे गॅरेज मधून गोळा करून पुनर्प्रक्रियेसाठी रिफायनिंग फॅक्टरी यांना देतात. आपल्या रोजी रोटीसाठी त्यांचे काम सुरु असून, ते एकप्रकारे पर्यावरण रक्षणही करत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

काळे ऑइल हजारडस्ट म्हणजे धोकादायक कचरा या संज्ञेत येते. हे ऑइल जर पाण्यात गेलं तर पाणी प्रदूषित होते आणि जमिनीत हे ऑइल पसरल्यास जमीन नापीक होते. सभासदांच्या कामामुळे पर्यावरणाला असलेला धोका टळतो. या सर्व कामगिरीबद्दल त्यांचे कौतुक होण्याऐवजी त्यांना प्रशासकीय व्यवस्था आणि पोलिसांकडून विविध प्रकारे त्रास देण्याचे काम केले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. काळे ऑइलचा आणि खाद्य तेलाचा काही संबंध नसताना अन्नपुरवठा विभागही या कष्टकऱ्यांना त्रास देण्याचे काम करत आहे. जागतिक पर्यावरण दिनी स्वत:चा पोट भरुन पर्यावरण रक्षणाचे काम करणारे ऑइल वेचक कष्टकरी न्याय मागण्यांसाठी धरणे आंदोलन करणार आहेत.

# 'निसर्गप्रेमी संघटना व लोकभज्ञाक चळवळी'च्या कार्यकर्त्यांची ३० मे रोजी महानगरपालिकेत बैठक

## हरित शहर करण्यासाठी होणार चर्चा, ग्लोबल वॉर्मिंग विरोधात जय जवान, जय किसान, जय विज्ञान, जय निसर्गपाल घोषणा

नगर – पर्यावरणाचे प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेऊन वृक्षरोपण व संवर्धनासाठी सरसावलेल्या शहरातील निसर्गप्रेमी संघटना, लोकभज्ञाक चळवळीचे कार्यकर्ते व निसर्गपाल म्हणून काम करण्याची तयारी दाखवलेल्या कार्यकर्त्यांची बैठक महापालिका प्रशासनाच्या वतीने गुरुवारी (दि.३० मे) आयोजित करण्यात आली आहे. ग्लोबल वॉर्मिंग विरुद्धच्या लढाईत सामील होण्यासाठी लोकभज्ञाक चळवळीच्या वतीने जय जवान, जय किसान, जय विज्ञान, जय निसर्गपाल अशी घोषणा जारी करण्यात आली आहे.

महापालिकेचे उपायुक्त विजयकुमार मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये महापालिकेत ही बैठक बोलविण्यात आली आहे. यामध्ये नॅनो धनराई व अजीवन निसर्गपाल योजनेबाबत चर्चा केली जाणार आहे. यावेळी महापालिकेचे आयुक्त डॉ. पंकज जावळे, उद्यान विभाग प्रमुख शशिकांत नजन उपस्थित राहणार आहेत. या बैठकीसाठी अजीवन निसर्गपाल म्हणून काम करण्याची तयारी दाखवलेली ॲड. अनिल सरोदे, ॲड. संदीप वांढेकर, कॉ. बाबा आरगडे, कॉ.डॉ. महेबूब शेख, अशोक सब्बन, ॲड. नामदेव दरंदले, मनसुख गांधी, बाळासाहेब पवार, शाहीर कान्हू सुंबे, ॲड. लक्ष्मण पोकळे, अशोक सब्बन, ओम कदम, प्रकाश थोरात, जालिंदर बोरुडे, ललिता गवळी, अशोक कुलकर्णी, ॲड. समीर पटेल, ॲड. राजेश कावरे, ॲड. बबन सरोदे, ॲड. सारस क्षेत्रे, ॲड. कारभारी गवळी आदी उपस्थित राहणार आहेत.

शहर निसर्ग श्रीमंत करण्यासाठी आणि प्रत्येक घर आणि बंगल्याच्या आवारात नॅनो धनराई उभी करण्यासाठी तसेच आपल्या घराच्या आसपास आणि कॉलनीत मोठ्या प्रमाणात झाडे लावून वाढविण्याचा प्रयत्न करणाऱ्या कार्यकर्त्यांचे विचार समजून घेऊन महापालीका सकारात्मक कारवाई करणार आहे. महापालिका उपायुक्त मुंडे यांनी लोकभज्ञाक चळवळीच्या कार्यकर्त्यांची भेट घेतली असता, नॅनो धनराईन आणि आजीवन निसर्गपाल संकल्पना जाणून घेतली. शहरात २ हजार निसर्गपाल तयार झाले पाहिजे, यासाठी महापालिका देखील मदत करणार आहे. निसर्ग संवर्धन आणि वृक्ष लागवड करण्यासाठी हजारो लोकांना सहभागी करुन घेण्याचा या चळवळीच्या वतीने प्रयत्न राहणार आहे. प्रत्येक निसर्गपाल आपल्या घराभोवती नॅनो धनराई उभारणार असून, त्याचबरोबर निसर्गपाल राहत असलेल्या परिसरात नागरिकांना धनराई उभारण्यात सहकार्य करणार आहे. महापालिकेच्या रस्त्याच्या कडेला झाडे लावून त्यांचे संवर्धन निसर्गपाल नागरिकांच्या मदतीने केले जाणार असून, यासाठी ही बैठक महत्त्वाची ठरणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

ग्लोबल वॉर्मिंगचा प्रश्न गंभीर झाला आहे. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने ग्लोबल वार्मिंगविरुद्ध लढण्यासाठी झाडे लावली पाहिजेत आणि जगवली पाहिजे अशी भावना उपायुक्त मुंडे यांनी व्यक्त केली आहे. शहरातील सामाजिक व निसर्गप्रेमी कार्यकर्त्यांनी या बैठकीला उपस्थित राहावे, असे महापालिका उद्यान विभागाचे प्रमुख शशिकांत नजन व ॲड. कारभारी गवळी यांनी आवाहन केले आहे.

# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद विशेष पुरस्कार स्व. रितेश साळुंके यांना जाहीर



नगर – अखिल भारतीय मराठी नाट्य परीषद मध्यवर्ती शाखेच्या वतीने स्व.रितेश भारत साळुंके यांना विशेष कार्यकर्ता पुरस्कार जाहीर झाला असून तशी घोषणा परिषदेचे अध्यक्ष अभिनेते प्रशांत दामले यांनी केली.

नाट्य परिषदेच्या माध्यमातून मराठी हौशी रंगभूमीवर विनामूल्य कार्य करणाऱ्या कलाकारास विशेष कार्यकर्ता पुरस्कार दिला जातो अशी माहिती खजिनदार सतीश लोटके यांनी दिली.

स्व.रितेश साळुंके यांचे अहमदनगरच्या हौशी रंगभूमीवरील कार्य मौलिक असे होते. रंगकर्मी प्रतिष्ठानचे ते अध्यक्ष होते. अनेक कलाकार त्यांच्या संस्थेतून नावारूपाला आले. ते स्वतः एक उत्तम अभिनेते, लेखक, दिग्दर्शक होते. नाट्य शास्त्राचा त्यांनी अभ्यासक्रम पूर्ण केला होता. शालेय जीवनापासून त्यांनी बीडच्या परिवर्तन प्रतिष्ठान या नाट्यसंस्थेच्या माध्यमातून रंगभूमीवर काम करायला सुरुवात केली होती.

राज्य नाट्य स्पर्धा, स्वागताध्यक्ष करंडक, अक्षर करंडक एकांकिका स्पर्धा तसेच जिल्ह्यात आणि ग्रामीण भागात होणाऱ्या स्पर्धांना त्यांचे मोठे सहकार्य मिळाले. समीक्षक, परीक्षक, आयोजक तसेच स्पर्धा प्रमुख म्हणून त्यांनी नगरच्या रंगभूमीला योगदान दिले. अहमदनगर येथील ८३ व्या नाट्य संमेलनात त्यांनी महत्वपूर्ण जबाबदारी पार पाडली.

राज्यात दरवर्षी होणाऱ्या विविध ठिकाणच्या नाट्य संमेलनात त्यांची हजेरी असायची. हौशी रंगभूमीवर राज्यात होणाऱ्या विविध उपक्रमांचा ते अभ्यास करीत. मुंबई येथे होणारी कार्यक्रमात स्व.रितेश साळुंके यांचा पुरस्कार त्यांच्या पत्नी श्रीमती सपना साळुंके कन्या समीक्षा साळुंके स्वीकारणार आहेत, अशी माहिती अहमदनगर शाखेचे अध्यक्ष अमोल खोले यांनी दिली.

स्व.रितेश साळुंके यांच्या कार्याची दखल घेत नाट्य परिषद मध्यवर्ती शाखेने त्यांच्या कार्याचा गौरव करून रितेश साळुंके यांना न्याय दिला अशी भावना अध्यक्ष अमोल खोले, उपाध्यक्ष शशिकांत नजान, माध्यवर्तीचे खजिनदार सतीश लोटके यांनी व्यक्त केल्या.

# नगरचे डॉ. रूपेश सिकची यांनी केली २ दिवसाच्या बाळावर यशस्वी शस्त्रक्रिया



नगर – डॉ. रुपेश सिकची ह्यांनी आंबेजोगाई येथील लाड हॉस्पिटलमध्ये दोन दिवसाच्या बाळावर यशस्वीरित्या शस्त्रक्रिया केली.

शौचाची जागा अर्धवट विकसित झालेल्या आणि दोन दिवस वय असलेल्या केज येथील बाळावर आंबेजोगाई येथे डॉ. रुपेश सिकची (लहान मुलांचे सर्जन) ह्यांनी अवघड अशा प्रकारची यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आणि त्या बाळाला जीवदान मिळाले.

नुकत्याच प्रसुती झालेल्या बाळाला गुदद्वार नसल्यामुळे त्या बाळाला तात्काळ लाड हॉस्पिटल आंबेजोगाई येथे दाखल करण्यात आले. या बाळाची स्थिती अतिशय गंभीर होती. बाळाच्या नाड्या लागत नव्हत्या. पोट फुगलेले होते. वजनही कमी होते. अशा वेळी नगरचे डॉ. रुपेश सिकची ह्यांनी गांभीर्य ओळखून शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. पालकांशी चर्चा करून डॉ. लाड ह्यांचे मदतीने त्यांचेच हॉस्पिटलमध्ये डॉ. रुपेश सिकची ह्यांनी शस्त्रक्रिया यशस्वी केली.

पाच दिवसानंतर बाळामध्ये सुधारणा दिसून आली. आता बाळ ठणठणीत आहे.

# केंद्र शासनाने मल्लखांब खेळाचा सन्मान वाढवला

## पद्मश्री उदय देशपांडे यांचे प्रतिपादन; ४० व्या राज्य अजिंक्यपद मल्लखांब स्पर्धेचे उद्‌घाटन, पोल व रोप मल्लखांबावर रंगले चित्तथरारक कवायती

नगर – केंद्र शासनाने मल्लखांब क्षेत्रात अर्जुन पुरस्कार, द्रोणाचार्य पुरस्कार व पद्मश्री पुरस्कार देऊन या खेळाचा सन्मान वाढवला. हा सन्मान सर्व मल्लखांबपटूंचा आहे. हा खेळ कॉमनवेल्थ, आशियाई व ऑलिंपिकमध्ये समावेश होण्यासाठी सर्वांपुढे मोठे आव्हान आहे. सर्वांनी एकत्र येऊन हा खेळ पुढे घेऊन जायचा आहे. आपआपसातील मतभेद व गैरसमज दूर करुन समोपचाराने प्रश्न सोडवा. खेळाला बाधा निर्माण होईल असे कोणतेही वर्तन करु नये, असे आवाहन मल्लखांब खेळातील पद्मश्री उदय विश्वनाथ देशपांडे यांनी केले.








४० व्या राज्य अजिंक्यपद मल्लखांब स्पर्धेच्या उद्‌घाटन प्रसंगी पद्मश्री उदय देशपांडे. छायाचित्रात मल्लखांब, पोल व रोपमल्लखांबवर कसरत करणारे स्पर्धक.

अहमदनगर जिल्हा मल्लखांब असोसिएशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या ४० व्या राज्य अजिंक्यपद मल्लखांब स्पर्धेच्या उद्‌घाटनाप्रसंगी पद्मश्री देशपांडे बोलत होते.

वाडियापार्क क्रीडा संकुल येथे महाराष्ट्र हौशी मल्लखांब संघटनेच्या मान्यतेने व जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांच्या सहकार्याने सुरु झालेल्या दोन दिवसीय स्पर्धेच्या उद्‌घाटनाप्रसंगी द्रोणाचार्य देवरुखकर, राज्य संघटनेचे कार्याध्यक्ष उत्तमराव लटपटे, सचिव श्रेयस म्हसकर, शिवछत्रपती विजेते तथा कोषाध्यक्ष बापूसाहेब समलेवाले, सहसचिव विश्वतेज मोहिते, क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे, पांडूरंग वाघमारे, अनिल नागपुरे, यशवंत जाधव, ॲड. संजय केकाण, सचिन परदेशी, मोहन झुंजे पाटील, जिल्हा मल्लखांब असोसिएशन अध्यक्ष राजकुमार धोत्रे, कोषाध्यक्ष होनाजी गोडळकर, सचिव अनंत रिसे, राजाभाऊ अवसक, निलेश कुलकर्णी, उपाध्यक्ष नंदेश शिंदे, अमित जिनसीवाले, तांत्रिक समिती सदस्य विष्णू देशमुख, सतीश दारकुंडे, अजित लोळगे, मोहनीराज लहाडे, प्रकाश सोनी, शिवछत्रपती पुरस्कार विजेते सत्यजीत शिंदे, माया मोहिते, पंकज शिंदे, रविंद्र पेटे, ऋषीकेश अरणकल्ले, सुनिल गंगावने, अभिजीत भोसले आदी उपस्थित होते.

पुढे पद्मश्री देशपांडे म्हणाले की, देशभरात मोठ्या प्रमाणात राष्ट्रीय स्तरावर मल्लखांबच्या स्पर्धा होत आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणात खेळाडू सहभागी होत असून, खेलो इंडिया या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत मल्लखांबचा समावेश करण्यात आला. यामुळे या खेळाला एक वेगळी दिशा मिळाली. परदेशातही या खेळाचे मोठे आकर्षण आहे. परदेशात प्रशिक्षक म्हणून जाण्याची संधी भारतीयांना मिळणार आहे.

पॅरिसच्या ऑलिंपिकमध्ये मल्लखांबाचे प्रात्यक्षिक सादर करण्यासाठी देखील पाठपुरावा सुरू आहे. मल्लखांबचा सन्मान हा खेळाडूंमुळे वाढत आहे. नगरमध्ये ही स्पर्धा होण्या अगोदरच तक्रारी वरुन राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाची नोटीस मिळाली. मात्र सर्व अटी, शर्तीची पुर्तता करुन दृष्ट लागावी अशी उत्तम प्रकारे ही स्पर्धा खेळाडूंसाठी पार पाडत असल्याचे त्यांनी सांगितले.

पहिल्याच दिवशी मल्लखांब स्पर्धेसाठी राज्यातील ४०० पेक्षा अधिक खेळाडू, त्यांचे प्रशिक्षक व पालक स्पर्धेच्या ठिकाणी दाखल झाले आहेत. १२ व १४ वर्षे आतील मुले व मुलींच्या सकाळ पासूनच पुरलेले मल्लखांब व रौप मल्लखांबावर चित्तथरारक कवायती रंगल्या होत्या. मुला-मुलींनी पोल व रोप मल्लखांबावर चित्तथरारक खेळाचे प्रदर्शन घडवून उपस्थितांची मने जिंकली.

या स्पर्धेतून शारीरिक लवचिकता व चपळपणाचा उत्कृष्ट खेळ पहावयास मिळाला. तर रोप मल्लखांबावर खेळाडूंनी १० ते १५ फुट उंचीवर विद्यार्थ्यांच्या विविध धाडसी प्रात्यक्षिकांनी उपस्थितांच्या ह्ृद्याचा ठोका चुकवला. सकाळ व संध्याकाळच्या दोन सत्रात या स्पर्धा रंगत आहे. खेळाडूंच्या सोयीसाठी नियोजन पुस्तिकांचे अनावरण करुन ते खेळाडूंना वाटप करण्यात आले.

श्रेयस म्हसकर म्हणाले की, अतिशय सुंदर वातावरणात मल्लखांब स्पर्धा होत असून, अपेक्षेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग नोंदवला आहे. पालकांनी देखील आपल्या मुलांना स्पर्धेसाठी घेऊन आल्याचा उत्साह दिसून येत असल्याचे सांगितले. अनंत रिसे यांनी १६ वर्षानंतर प्रथमच नगर शहरात मल्लखांबाची राज्यस्तरीय स्पर्धा मोठ्या दिमाखात होत आहे. मल्लखांबचा थरार डोळ्यांनी अनुभवण्यासाठी नगरकरांना उपस्थित राहण्याचे त्यांनी आवाहन केले.

उत्तमराव लटपटे यांनी उन्हाळ्यातही या स्पर्धेचे उत्तम प्रकारे नियोजन करण्यात आले असून, खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी ही स्पर्धा संजीवनी ठरणार असल्याचे स्पष्ट केले. द्रोणाचार्य देवरुखकर यांनी मल्लखांबकडे फक्त स्पर्धा म्हणून न पाहता हा देशातील प्राचीन खेळ असून, मल्लखांबाचे ४० विविध प्रकार आहे. त्याची देखील खेळाडूंना माहिती घेणे अपेक्षित असल्याचे सांगितले.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी आ. संग्राम जगताप व उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांचे सहकार्य लाभत आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नंदेश शिंदे यांनी केले. आभार राजकुमार धोत्रे यांनी मानले.

## 'हिमालयाची सावली, त्यागमूर्ती 'माता रमाई'

आज २७ मे भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी रमाई यांची पुण्यतिथी. ७ फेब्रुवारी १८९७ रोजी माता रमाई यांचा जन्म एका गरीब कुटूंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भिकू धोत्रे (वलंगकर) तर आईचे नाव रुक्मिणी असे होते.

दाभोळजवळील वनंदगावात नदीकाठी महारपुरा वस्तीमध्ये त्या राहत होत्या. त्यांना तीन बहिणी व एक भाऊ होता. त्यांचे वडील दाभोळ बंदरात माशांनी भरलेल्या टोपल्या पोहचवत असत. रमाई लहान असतानाच त्यांच्या आईचे निधन झाले. काही दिवसांनी वडिलांचेही निधन झाले. लहान वयातच आई वडिलांचे छत्र हरपल्याने कोवळ्या रमाईच्या मनावर मोठा आघात झाला. आई वडिलांविना पोरक्या झालेल्या या भावंडांना वलंगकर काका व गोविंदपूरकर मामा यांनी मुंबईला आणले. मुंबईतील भायखळा मार्केटच्या चाळीत ते राहू लागले. त्याच सुमारास सुभेदार रामजी आंबेडकर हे आपल्या भीमरावसाठी मुलगी पाहत होते. वलंगकारांकडे लग्नाची मुलगी असल्याचे त्यांना समजले. सुभेदार रामजी आंबेडकर यांनी रमाईला पाहिले. रमाईला पाहता क्षणिच सुभेदाराने तिला आपल्या भीमरावासाठी पसंत केली.

रमाई आणि भीमराव यांचा भायखळ्याच्या मार्केटमध्ये विवाह झाला. विवाहाप्रसंगी बाबासाहेबांचे वय चौदा तर रमाईचे वय नऊ वर्ष होत. त्यावेळी बाल विवाहाची प्रथा समाजात रूढ होती. लग्नात पंच पक्वान्ने नव्हती. झगमग रोषणाई नव्हती. अतिशय साध्या पद्धतीने हा विवाह पार पडला. माता रमाईला जीवनात अनेक दुःखे सहन करावी लागली. १९२३ साली बाबासाहेब लंडनला गेले. त्यावेळी रमाईची खुप वाताहत झाली. ती दुष्काळाच्या आगीत होरपळत होती. बाबासाहेबांच्या कार्यकर्त्यांना त्यांचे हाल पहावले नाही त्यांनी काही पैसे जमा केले व ते पैसे रमाईला देऊ केले. त्यांनी कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर केला मात्र पैसे स्वीकारण्यास नम्रपणे नकार दिला. रमाई या बाबासाहेबांप्रमाणेच स्वाभिमानी होत्या. माता रमाई या आयुष्यभर दुःखाशी, गरीबीशी जिद्दीने झगडत होत्या मात्र हार मानत नव्हत्या.

मृत्यूसत्र, दुःख, त्याग, समजूतदारपणा, कारुण्य, उदंड मानवता आणि मृत्यू यांचे सर्जनशील ज्वलंत प्रेरणास्थान म्हणजे माता रमाई. रमाईने अनेक दुःखे झेलली. त्यांच्या इतके मरण कोणीही पाहिले नसेल. लहान वयातच आई वडिलांचा मृत्यू, १९१३ साली सासरे शुभेदार रामजी आंबेडकर यांचा मृत्यू, बाबासाहेबांचे मोठे बंधू आनंदराव, त्यांचा मुलगा गंगाधर यांचा मृत्यू, १९२१ साली बाबासाहेबांचा मुलगा बाळ गंगाधर, १९२६ मध्ये राजरत्न असे अनेक मृत्यू त्यांनी पाहिले पण त्या डगमगल्या नाहीत. पती बाबासाहेब आंबेडकर परदेशात शिकायला गेल्यावर त्या एकट्या घर चालवत होत्या. घर चालवण्यासाठी तिने शेण गोवऱ्या वेचल्या. बॅरिस्टर पतीची पत्नी शेण गोवऱ्या गोळा करते असे लोक नावे ठेवतील म्हणून त्या पहाटे लवकर उठून शेण गोवऱ्या गोळा करत. आयुष्यभर काबाड कष्ट करून त्यांचे शरीर पोखरून गेले होते. त्यामुळे त्या आजारी पडल्या. जानेवारी १९३५ पासून आजार वाढत गेला. मे १९३५ ला त्यांचा आजार विकोपाला गेला. बाबासाहेबांनी सर्व नामांकित डॉक्टरांना पाचारण केले. मात्र त्यांचे शरीर औषधोपचारांना प्रतिसाद देत नव्हते. बाबासाहेब त्यांना फळांचा ज्यूस, चहा, कॉफी पाजत. मात्र त्यांच्या तब्येतीत सुधारणा होत नव्हती. अखेर २७ मे १९३५ रोजी रमाईची प्राणज्योत मावळली. सर्व परिसर आकांतात बुडाले. बाबासाहेबांना हे दुःख पचवणे अवघड गेले. ते रमाईच्या पार्थिवाशेजारी बसून ढसाढसा रडले. जवळ जवळ तीस वर्षे हिमालयासारख्या महामानवाला धैर्याने व प्रेमाने साथ देणारी हिमालयाची सावली सोडून गेल्याने बाबासाहेब एकाकी पडले. हिमालयाची सावली बनलेल्या त्यागमूर्ती माता रमाई यांना पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन!

## बिझनेस सायकल फंडसोबत आर्थिक चक्रांमधून प्रवास


विनोद गुगळे

म्युच्युअल फंडांमध्ये गुंतवणूक करण्यामुळे अनेक प्रकारचे पर्याय उपलब्ध होतात. प्रत्येक फंडाची रचना ही वेगवेगळ्या गुंतवणूक उद्दिष्ट आणि जोखमीच्या संभाव्यतेसाठी केलेली असतो. सध्या प्रमुख स्थानी येत असलेली अशीच एक श्रेणी म्हणजे बिझनेस सायकल फंडची आहे. अर्थव्यवस्थेच्या चक्रीय स्वरूपाचा लाभ उठविणे हे तिचे लक्ष्य असते. हे फंड अनन्यसाधारण का ठरतात आणि यामध्ये गुंतवणूक करण्याचा विचार कोणी करावा, याचा विचार करूया.

अहमदनगर येथील म्युच्युअल फंड वितरक विनोद गुगळे म्हणाले की अर्थव्यवस्थेच्या वर्तमान चक्राचा टप्पा ओळखून त्यानुसार फंड पोर्टफोलियोची व्यवस्था करणे, या गृहितकावर बिझनेस सायकल फंड काम करतो. विस्ताराच्या टप्प्यामध्ये चक्रीय क्षेत्रावर लक्ष केंद्रीत करण्यात येते तर आकुंचनाच्या टप्प्यात संरक्षणात्मक क्षेत्राकडे लक्ष दिले जाते. या गतिशील दृष्टिकोनावर फंड मॅनेजरना संधींचा लाभ घेणे तसेच बदलत्या आर्थिक स्थितिसोबत येणाऱ्या जोखमीं मधून मार्ग काढणे शक्य होते.

विशिष्ट उद्योग किंवा संकल्पनांवर लक्ष केंद्रीत करणाऱ्या क्षेत्र-आधारित किंवा संकल्पना-आधारित योजनांच्या विपरीत बिझनेस सायकल फंड विविध क्षेत्रांमध्ये विभाजन कायम ठेवतात. मात्र आर्थिक चक्राची मागणी असेल त्यानुसार पोर्टफोलियो केंद्रीत करण्याची लवचिकतासुद्धा फंड मॅनेजरकडे असते. त्यामुळे संभाव्य संधी कमाल पातळीवर पोचतात.

**या फंडांमध्ये गुंतवणूक कोणी करावी?**

दीर्घकालीन दृष्टीने संभाव्य अधिक परतावा मिळवू पाहणारे आणि अधिक जोखीम घेण्याची क्षमता असणारे गुंतवणूकदार हे मुख्य उमेदवार असतात. मात्र फंड मॅनेजरची रणनीती फळाला येण्यासाठी किमान तीन ते पाच वर्षे काळासाठी गुंतवणूक कायम ठेवणे आवश्यक असते. लक्षणीय प्रमाणात लाभ निर्माण होण्याचे कालखंड येतीलही, परंतु गुंतवणूकदारांनी कामगिरीमध्ये चढ-उतार होण्याची तयारी ठेवली पाहिजे.

बिझनेस सायकल फंड हा आर्थिक चक्रांच्या भरती-ओहोटीच्या काळाचा लाभ घेऊन गुंतवणुकीसाठी गतिशील दृष्टिकोन देऊ करतात, मात्र गुंतवणुकीच्या अनुकूल परिणामांसाठी योग्य फंडाची निवड करणे अत्यावश्यक असते. बिझनेस सायकलनुसार गुंतवणुकीसाठी दहा ते बारा म्युच्युअल फंड उत्पादने असली तरी विविध कालखंडात सकारात्मक गुंतवणुकीचा अनुभव देणाऱ्या फंडांपैकी आयसीआयसीआय प्रुडेन्शियल बिझनेस सायकल फंड हा एक फंड आहे. या फंडाने २९ एप्रिल पर्यंत ५२.२० टक्के एवढा प्रभावशाली परतावा दिला असून दोन आणि तीन वर्ष काळात क्रमशः २७.३५ टक्के आणि २६.२९ टक्के एवढा सशक्त एकत्रित वार्षिक विकास दर दिला आहे. या प्रत्येक कालखंडात या फंडाने बेंचमार्कपेक्षा ६-१२ टक्के एवढ्या प्रमाणात जास्त कामगिरी केली आहे.


तारकपूर आगारातर्फे काढण्यात आलेली अयोध्या दर्शन बसला श्रीफळ वाढवून यात्रेचा शुभारंभ करताना कमलेश धनराळे, धर्मा पाटील व आगारातील कर्मचारी.

## तारकपूर आगाराची दर्शनयात्रा बस अयोध्येकडे मार्गस्थ

### भाविकांकडून 'जय श्रीराम'चा जयघोष

नगर - तारकपूर आगारातर्फे काढण्यात आलेली अयोध्या दर्शनयात्रा बस शुक्रवारी (दि. २४) सकाळी ८ वाजता अयोध्येकडे मार्गस्थ झाली. अहमदनगर विभागीय वाहतूक अधीक्षक कमलेश धनराळे व सुरक्षा व दक्षता अधिकारी धर्मा पाटील यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून यात्रेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी भाविकांनी 'जय श्रीराम'चा जयघोष केला.

तारकपूर आगारातर्फे अयोध्या, काशी (वाराणसी), प्रयागराज यासह उज्जैन महाकालेश्वर, ओंकारेश्वर व ममलेश्वर या तीन ज्योतिर्लिंगाच्या दर्शनाची सोय असणारी अयोध्या दर्शनयात्रा आयोजित करण्यात येते. मार्च महिन्यात मिळालेल्या उदंड प्रतिसादानंतर शुक्रवारी आगारातर्फे ही दुसरी दर्शनयात्रा बस सोडण्यात आली.

यावेळी विभाग नियंत्रक मनीषा सपकाळ, कामगार अधिकारी बाळासाहेब एकशिंगे, आगार व्यवस्थापक अभिजीत चौधरी, आगार वाहतूक अधीक्षक विठ्ठल केंगारकर, वाहतूक निरीक्षक सुरेंद्र कंठाळे, सहायक वाहतूक निरीक्षक नितीन येणे, सहायक वाहतूक निरीक्षक गोविंद पेडियार, वाहतूक नियंत्रक काशिनाथ सुलाखे पाटील, चालक राजेंद्र त्रिमुखे व सीताराम जगताप, वाहक जयदेव हेंद्रे यांच्यासह प्रवासी प्रतिनिधी शांता व संजयकुमार हजारे, संगीता व विजयकुमार हजारे, मंगल व विजय रावळे, गीतांजली व चंद्रकांत उकिर्डे, वंदना व सुभाष आबक, संध्याराणी व विठ्ठल चांडवले, पुष्पा व सीताराम ढोरजकर तसेच एसटी कर्मचारी, प्रवासी उपस्थित होते. सहा दिवसांचा प्रवास करून बुधवारी रात्री ही अयोध्या दर्शनयात्रा बस नगरला परतणार आहे.

## 'आनंदऋषीजी'मधील सूक्ष्म व्यायामाद्वारे मोफत मणके विकार उपचारांचा रूग्णांना लाभ

### कंबरदुखी, पाठदुखी, गुडघेदुखी, खांदेदुखीवर विनाऔषध परिणामकारक उपचार

नगर - विविध कारणांमुळे अनेकांना पाठीचे, मणक्यांचे विकार जडत असतात. अशा मणके विकारांवर राष्ट्रसंत आनंदऋषीजी हॉस्पिटलमधील आनंदऋषीजी ब्लड बँकेच्या तळमजल्यावर सूक्ष्म व्यायाम पद्धतीव्दारे मोफत उपचारांची कायमस्वरुपी व्यवस्था कार्यान्वीत आहे. याठिकाणी दररोज सकाळी १० ते ११ यावेळेत सूक्ष्म व्यायाम पध्दती उपचार तज्ज्ञ प्रसाद जोशी मार्गदर्शन करीत असतात.


आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आयोजित सुक्ष्म व्यायामाद्वारे मोफत मणके विकार उपचार शिबीरात रुग्णांवर उपचार करताना डॉ. प्रसाद जोशी.

सहा वर्षात आतापर्यंत शेकडो रूग्णांना या उपचारांनी आराम मिळाला आहे. स्व.पानाबाई लक्ष्मीचंद रूणवाल (विजापूर, कर्नाटक) यांच्या सहकार्याने ही सेवा सुरु आहे. यात मणक्यात गॅप पडणे, गादी सरकणे, कंबरदुखी, पाठदुखी, मानेचे दुखणे, गुडघेदुखी आदी विकारांनी त्रस्त रूग्णांना व्यायामाच्या साध्यासोप्या आणि तितक्याच परिणामकारक पध्दती शिकवल्या जातात.

यातून रूग्णांना हमखास गुण येत असून अनेकांनी तशा प्रतिक्रियाही दिल्या आहेत. सतत मुंग्या येणे, पूर्ण पाय दुखणे, मान अवघडणे, हात पायाला बधिरता येणे आदी लक्षणांवर ही सूक्ष्म व्यायाम पद्धती परिणामकारक आहे.

प्रताप राम भोजने यांनी सांगितले की, मला अचानक कंबर आणि पाय दुखण्याचा त्रास सुरू झाला. त्रास इतका वाढला की मला चालताना कोणाची तरी मदत घ्यावी लागत होती. एकाने मला जोशी सरांच्या उपचार पद्धतीची माहिती दिली. मी जोशी सरांशी संपर्क साधला. त्यांच्या सूचनेनुसार व्यायाम सुरू केला आणि अवघ्या तीन दिवसात मला फरक जाणवला. आता मी पूर्ण बरा आहे. सूक्ष्म व्यायाम उपचार पद्धती खूप लाभदायी आहे.

केशव शिंदे सांगतात, मी व माझ्या पत्नीने या सूक्ष्म व्यायाम पद्धतीने आजारापासून कायमचे मुक्त होण्याचा निर्धार केला. सातत्यपूर्ण व्यायाम करून मी आता पूर्ण बरा झालो आहे. माझी पत्नी कौशल्या आता नियमित व्यायाम करून बरी होण्याचा प्रयत्न करीत आहे.

गुंजन विनोद भंडारी यांनी सांगितले की, मला कंबर दुखीचा खूप त्रास होता. जोशी सरांनी अतिशय सहज व सोप्या पद्धतीचे व्यायाम सांगून करवून घेतले. मला खूप फरक पडला आता कंबरदुखी जवळपास बंद आहे.

नगर येथील अमृतलाल चंदूलाल कोठारी यांनी सांगितले की, मला खूप दिवसांपासून मान दुखण्याचा त्रास होता. मला संतोष बोथरा यांनी जोशी सरांकडे जायला सांगितले. त्यांनी सांगितल्याप्रमाणे घरीच मानेचे व्यायाम सुरू केले. आता मानेला खूप फरक पडला आहे. मी आजही नियमित व्यायाम करतो.

घोडेगाव (नेवासा) येथील सोपान सिताराम बऱ्हाटे यांनी सांगितले की, माझ्या एका पायाला नेहमी मुंग्या येत होत्या. दोन महिन्यांपासून मला उभेही राहता येत नव्हते. मला जोशी सरांची माहिती मिळाली. त्यांच्या सल्ल्यानुसार मी व्यायाम सुरु केला. पाच दिवसातच मला २० टक्के फरक पडला. आता मी सर सांगितल तो व्यायाम नियमित करून पूर्ण बरा होणार आहे.

अधिक माहितीसाठी संपर्क ९९२१२७२३०६. येताना जुने रिपोर्ट सोबत घेऊन येणे तसेच नाव नोंदणी आवश्यक आहे.


डॉ.ना.ज.पाउलबुधे कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयातील बी. फार्मसीच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. याप्रसंगी प्राचार्या अनुराधा चव्हाण, डॉ. वेणु कोला, डॉ.शाम पंगा, डॉ.रोशनी सुर्यवंशी, डॉ.दुर्गेश पवळे, डॉ.प्रसाद घुगरकर, डॉ.विजय तारडे आदि. (छाया - विजय मते)

## फार्मसीच्या विद्यार्थ्यांना नोकरीबरोबर व्यवसायाची संधी

### अनुराधा चव्हाण यांचे प्रतिपादन; डॉ.ना.ज.पाउलबुधे कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयातील बी. फार्मसीच्या विद्यार्थ्यांना निरोप

नगर - आज आरोग्य क्षेत्र वाढत आहे, त्या प्रमाणात कुशल मनुष्यबळाचीही तितक्याच प्रमाणात गरज भासत आहे. त्यामुळे या क्षेत्रात सेवेबरोबरच करिअरच्याही मोठ्या संधी आहे. फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्याने या क्षेत्रात यश मिळविले पाहिजे. कारण फार्मसीमध्ये नोकरी बरोबरच व्यवसायाचीही संधी मिळत आहे. डॉ.ना.ज.पाउलबुधे कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकास साधण्याचा प्रयत्न केला आहे. नियमित अभ्यासाबरोबर विविध फार्मसी कंपन्यांना विद्यार्थ्यांची भेटी, तज्ञांचे व्याख्याने, सेमिनार आदि उपक्रमात विद्यार्थी हे परिपूर्ण झाले आहेत. त्याचबरोबर विविध कंपन्यांच्या कॅम्पस इंटरव्ह्युमध्येही अनेक विद्यार्थ्यांना चांगले पॅकेज मिळाले आहे, त्यामुळे भविष्यात या क्षेत्रात आपले चांगले करिअर घडवतील, असा विश्वास प्राचार्या अनुराधा चव्हाण यांनी व्यक्त केला.

वसंत टेकडी येथील डॉ.ना.ज.पाउलबुधे कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयातील बी. फार्मसीच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. याप्रसंगी प्राचार्या अनुराधा चव्हाण, डॉ.वेणु कोला, डॉ.शाम पंगा, डॉ.रोशनी सुर्यवंशी, डॉ.दुर्गेश पवळे, डॉ.प्रसाद घुगरकर, डॉ.विजय तारडे, स्वाती कडनोर, गौरी ढवळे, श्रद्धा कळसे, पल्लवी अडागळे, श्रद्धा मुंदडा, मोहसिन शेख, मिलिंद क्षीरसागर, सुधीर गर्जे आदि उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करतांना कॉलेज जीवनातील अनुभव कथन केले. शिक्षणाबरोबरच व्यवहारिक ज्ञान आणि फार्मसी क्षेत्रातील बदलांची माहिती, करिअरच्या संधी या विषयी सखोल ज्ञान उपलब्ध करुन दिले. शिक्षकांनी दिलेले ज्ञान आणि संस्कार हे आमच्या पुढील भविष्यासाठी नेहमीच मार्गदर्शक राहतील, असे अनंत गुठे, आकाश वाघुळे, ऋषीकेश हुशार, रणवीर अकोलकर, अभिनव दराडे, पायल करांडे यांनी सांगितले.

या सर्व विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष विनय पाउलबुधे, रामकिसन देशमुख, साई पाउलबुधे, डॉ.श्रद्धा पाउलबुधे, बी.एड्.च्या प्राचार्या डॉ.रेखाराणी खुराणा व शिक्षकवृंदांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रेरणा गदादे यांनी केले तर आभार श्रद्धा कळसे यांनी मानले.

## सांस्कृतिक कलादर्पणचा सर्वोत्कृष्ट बालकलाकार पुरस्कार नगर येथील आरुष बेडेकरला प्रदान

### बोक्या सातबंडे ठरला सर्वोत्कृष्ट बालकलाकार



नगर - चंद्रशेखर सांडवे प्रतिष्ठान यांच्यावतीने गेल्या २६ वर्षांपासून आयोजित होणारा सांस्कृतिक कलादर्पण पुरस्कार सोहळा नुकताच मुंबईमध्ये पार पडला. भायखळा येथील शाहीर अण्णाभाऊ साठे नाट्यगृहामध्ये पार पडलेल्या या पुरस्कार सोहळ्यात अभिनेत्री हर्षदा खानविलकर यांच्या हस्ते आरुष बेडेकर याला बोक्या सातबंडे नाटकातील त्याच्या भूमिकेसाठी यंदाचा व्यावसायिक नाटक विभागातील सर्वोत्कृष्ट बालकलाकार हा विशेष घोषित पुरस्कार देण्यात आला.

बालशंकर महाराजांच्या भूमिकेमुळे संपूर्ण महाराष्ट्रात झालेला बालकलाकार आरुष आता रंगभूमी सुद्धा तितक्याच ताकदीने गाजवतो आहे. सिद्ध झालं आहे आरुषचं हे पहिलंच नाटक आहे मात्र त्यानी बोक्या सातबंडे या नाटकात जी मध्यवर्ती भूमिका साकारली आहे ती खरोखरच व्यावसायिक रंगभूमीवरील एखाद्या सरावलेल्या कलाकाराने केली आहे असे आमच्या सर्व परीक्षकांना वाटल्यामुळेच त्याला हा विशेष घोषित पुरस्कार यंदा आम्ही दिला, अशी माहिती सांस्कृतिक कलादर्पणचे प्रमुख चंद्रशेखर सांडवे यांनी दिली.

मागच्या वर्षी सुरु झालेलं बोक्या सातबंडे हे नाटक रसिक प्रेक्षकांच्या पसंतीला उतरलं आहे. लहान मुलांसह मोठ्या माणसांना सुद्धा अतिशय भावणार हे नाटक लोकांना आपलंसं करतं. नुकताच या नाटकाने आपल्या ७५ प्रयोगांचा टप्पा पूर्ण केला आहे.

सोलापूर, कोल्हापूर, सांगली, सातारा, जळगाव, कुडाळ, नाशिक, पुणे, मुंबई, सासवड, बारामती असा महाराष्ट्र दौरा करणारे बहुदा हे पहिलंच व्यावसायिक बालनाट्य आहे. लवकरच या नाटकाचे महाराष्ट्र बाहेर बेंगलोर, इंदोर आणि गोवा येथे सुद्धा प्रयोग होणार आहेत. १०० व्या प्रयोगाकडे वाटचाल करणारं हे नाटक सर्व नगरकर रसिकांना ३० मे रोजी पाहायला मिळणार आहे.


जय बजरंग विद्यालयामध्ये शालेय अंतर्गत बुद्धीबळ प्रशिक्षण शिबिरात प्राचार्या संगीता पाठक यांचा सत्कार करताना अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया. समवेत अमोल क्षीरसागर, यशवंत बापट, सुबोध ठोंबरे, पारुनाथ ढोकळे.

## बुद्धिबळ खेळ जोपासल्यास विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो : नरेंद्र फिरोदिया

नगर - दैनंदिन जीवनात विद्यार्थी दशेत बुद्धिबळ हा खेळ विद्यार्थ्यांनी जोपासल्यास विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास सर्वतोपरी होण्यास मदत होईल, असे प्रतिपादन आशा एज्युकेशन फाउंडेशन तथा अहमदनगर बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांनी केले.

नगर शहरातील जय बजरंग विद्यालयामध्ये शालेय अंतर्गत बुद्धिबळ प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी आशा एज्युकेशन फाउंडेशनचे सहसचिव उमेश गांधी, विद्यालयाच्या प्राचार्या संगीता पाठक, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक अमोल क्षीरसागर, तपोवन माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका वर्षा कुसकर, अहमदनगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे सचिव यशवंत बापट, खजिनदार सुबोध ठोंबरे, सदस्य पारुनाथ ढोकळे, संदीप देसरडा, व्यवस्थापक आशुतोष घाणेकर आदी उपस्थित होते.

## गरजू विद्यार्थिनींना शैक्षणिक किटचे होणार वाटप

### घर घर लंगर सेवा, लायन्स व लिओ क्लबचा पुढाकार; नगरकरांना सामाजिक कार्यास हातभार लावण्याचे आवाहन

नगर - कोरोना काळात गरजूंची भुक भागविणाऱ्या व आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना आधार देणाऱ्या घर घर लंगर सेवा, लायन्स क्लब ऑफ अहमदनगर व लिओ क्लब ऑफ अहमदनगर यांच्या वतीने यावर्षी गरजू मुलींना शैक्षणिक साहित्याची मदत केली जाणार आहे. जूनमध्ये शाळा सुरु झाल्यावर शहरातील विविध शाळांमधील गरजू विद्यार्थिनींना शैक्षणिक साहित्याची किट दिली जाणार असून, या सामाजिक कार्यासाठी हातभार लावण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

परिस्थिती अभावी मुलींचे शिक्षण अर्धवट राहू नये, यासाठी मुलींच्या शिक्षणास प्रोत्साहन देण्याचे काम या उपक्रमाद्वारे केले जाणार आहे. कोरोना काळातही गरजू विद्यार्थ्यांना ऑनलाईनचे शिक्षण घेता यावे, या उद्देशाने विद्यार्थ्यांना स्मार्ट फोन, लॅपटॉप, शैक्षणिक साहित्य व पेन ड्राईव्हचे वाटप करण्यात आले होते. तर झोपडपट्टीत जाऊन गरजू विद्यार्थ्यांना साहित्य देण्यात आले. मागील वर्षी देखील १११ मुलींना सायकल वाटप करून सुमारे १७ शाळेत सायकल बँक स्थापना करण्यात आली.

यावर्षी देखील घर घर लंगर सेवा, लायन्स क्लब ऑफ अहमदनगर व लिओ क्लब ऑफ अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने इयत्ता सहावी, सातवी व आठवीच्या मुलींना शालेय बॅग, वह्यांचे सेट आणि कंपास अशा प्रकारे शैक्षणिक साहित्याची किट वाटण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

मुली या शिक्षण क्षेत्रात आघाडीवर असून, आपले कर्तृत्व सिध्द करत आहे. परंतु अजून देखील अनेक मुलींना जी मदत पाहिजे ती प्राप्त होत नाही. मुलगी आहे म्हणून तिला दुय्यम लेखले जाते, मोठ्या भाऊची वह्या जुनी पुस्तके देण्यात येतात. ग्रामीण भागात घरची परिस्थिती बिकट असताना मुलींना शाळेतून काढण्यात येते. अशा परिस्थिती मधील मुलींना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने त्यांना शैक्षणिक साहित्याचे किट वाटप केले जाणार आहे. मुलींना वाटप केले जाणाऱ्या शैक्षणिक साहित्य असलेल्या एका किटची किंमत ३३० रुपये असून, यात सर्व नगरकर हातभर लावून मुलींच्या शिक्षणासाठी सहकार्य करण्याचे हरजीतसिंह वधवा व प्रितपालसिंह धुप्पड यांनी स्पष्ट केले आहे.

सहकार्यासाठी गुरु अर्जुन सामाजिक प्रतिष्ठान संचलित तारकपूर येथील घर घर लंगर सेवा अन्नछत्रालय येथे सायंकाळी ६ ते ८ येथे भेट देऊन अथवा ९४२३१६२७२७ या नंबरवर संपर्क साधण्याचे म्हंटले आहे.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी जनक आहुजा, प्रशांत मुनोत, लायन्सचे अध्यक्ष धनंजय भंडारे, राजेंद्र कंत्रोड, गुलशन कंत्रोड, सतीश गंभीर, राहुल बजाज, दिलीप कुलकर्णी, सोमनाथ चिंतामणी, राजू जग्गी, राजा नारंग, सिमर वधवा, मुन्ना जग्गी, कैलाश नवलानी, जस्मीतसिंह वधवा, सुनील छाजेड, राजेश कुकरेजा, जय रांगलानी, विपुल शाह, डॉ. संजय असनानी, दामोदर बठेजा, प्रमोद पंतम, दलजीतसिंह वधवा, सनी वधवा, जतिन आहुजा, किशोर मुनोत, संदेश रपारिया प्रयत्नशील आहेत.

ऑनलाईन मदत करण्यासाठी ९४२३१६२७२७ या नंबरवर गुगल पे किंवा गुरु अर्जुन सामाजिक प्रतिष्ठान, ॲक्सिस बँक, खाते नंबर २१५०१०१०००१४५८०, आयएफएससी कोड- UTIB००००२१५ यामध्ये आर्थिक मदत पाठविण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.



## प्रथम वर्धापन दिनानिमित्त श्री विजय शंकर मंदिरात २९ मे रोजी महाप्रसादाचे वाटप

नगर - नगरमध्ये जनरल पोस्ट समोरील श्री विजय शंकर मंदिरात २९ मे रोजी शिवलिंग प्रथम वर्धापन दिनानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी १२ वाजता महाआरती होणार आहे. नंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. तरी भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंदिराचे पुजारी राजेंद्र राजमाने यांनी केले आहे.

# अर्थजगत

**अर्थव्यवस्थेच्या कलाचे प्रमुख निर्देशक असणाऱ्या ग्राहक किंमत निर्देशांक (सीपीआय) आणि औद्योगिक उत्पादन निर्देशांक (आयआयपी) यांच्या मापनासाठी निर्धारित आधारभूत वर्षात बदल करण्याच्या मुद्द्यावर केंद्र सरकार विचार करीत असल्याची चर्चा आहे. सीपीआय आणि आयआयपीची गणना करण्यासाठी २०२२-२३ हे नवीन आधारभूत वर्ष ठरविले जाण्याची शक्यता आहे. हे करोना महासाथीनंतरचे पहिले 'सामान्य वर्ष' असून अनेक निर्देशक हे करोनापूर्व पातळीच्या अगदी जवळ पोहोचले आहेत. हा बदल येत्या दोन वर्षात म्हणजेच आर्थिक वर्ष २०२६-२७ पर्यंत लागू होण्याची शक्यता आहे. यासाठी राष्ट्रीय लेखाविषयक सल्लागार समितीची पुनर्रचना करावी लागेल. या समितीमध्ये सामान्यत: सरकारी विभाग, सांख्यिकी कार्यालय, शैक्षणिक आणि उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ आणि मान्यवरांचा समावेश असतो.**






## मुदत ठेवींची दुसरी बाजू

आपल्याकडील पैसा गुंतवण्यासाठी सामान्य गुंतवणूकदार सर्वप्रथम बँकेतील मुदत ठेवीचा विचार करतात. बँकेतील मुदत ठेवी अथवा पोस्टातील ठेवी या सुरक्षित मानल्या जात असल्याने गुंतवणुकीच्या या पर्यायांना प्राधान्य दिले जाते. मात्र गुंतवणूक तज्ज्ञांच्या मते मुदत ठेवीचा पर्याय गुंतवणूकदारांच्या दृष्टीने तितकासा फायद्याचा नसतो. मुदत ठेवीमध्ये गुंतवणूक करताना केवळ आकर्षक व्याजदरांबरोबरच इतरही गोष्टी पाहणे गरजेचे असते.

**परताव्यावरील कर** : कोणतीही गुंतवणूक करताना त्यातून आपल्याला काय परतावा मिळणार हे पाहणे सर्वांत महत्त्वाचे असते. हा परतावा आणि त्यावर बसणारा आयकर हाही भाग महत्त्वाचा असतो. आयकर कापून गुंतवणुकीतून किती परतावा मिळणार याचा विचार सामान्य गुंतवणूकदाराने केला पाहिजे. बँकांमधील मुदत ठेवी तसेच पोष्टातील ठेवी यावरचे उत्पन्न पूर्णतः करपात्र असते. त्यामुळे ठेवीवर मिळणाऱ्या व्याजावर आयकर कापून घेतला जातो. हा विचार केला तर बँकांमधील मुदत ठेवी या गुंतवणूकदाराच्या दृष्टीने फारशा फायद्याच्या ठरत नाहीत. याचे कारण बँकेकडून ठेवीवरील व्याजावर टीडीएस आकारला जातो.

**महागाईदराशी तुलना** : बँकांत ठेवलेल्या ठेवींची मुदत जेव्हा संपेल तेव्हा त्यावर मिळणारे पैसे आणि त्यावेळचा महागाईचा दर याचा विचार केला तर आपल्या हाती काहीच लागलेले नाही, हे लक्षात येईल. याचे कारण महागाई ज्या दराने वाढते आहे, त्या प्रमाणात ठेवीवरील व्याजाचे दर वाढत नाहीत. सध्या बँकांमधील ठेवींवर नऊ ते दहा टक्के या दराने व्याज दिले जाते आहे. या व्याजदराने मिळणारे उत्पन्न वाढत्या महागाईचा विचार केला तर गुंतवणूकदारासाठी अपुरेच ठरते असे दिसून येईल. त्यामुळे महागाईच्या दराचा निकश लावल्यास बँकांतील मुदत ठेव हा चांगला पर्याय ठरत नाही.

**मुदतपूर्व ठेव मोडल्यास होणारे नुकसान** : आपल्याला गरजेनुसार केव्हाही ठेवीचे पैसे काढता येतात, असे गुंतवणूकदार सांगत असतात. अडीअडचणीच्या वेळी आपण तासाभरात बँकेत जाऊन मुदत ठेवी मोडू शकतो आणि त्याची रक्कम घेऊ शकतो. हे जरी खरे असले तरी असे करणे आपल्याला आर्थिकदृष्ट्या तोट्याचेच ठरते. ठेवीची मुदत संपायच्या आधी ठेव मोडल्यास आपल्याला कमी व्याज मिळते. म्हणजे, आपण ठेव ठेवताना साडे नऊ टक्के दराने ठेवली असेल आणि मुदत संपायच्या आताच ती ठेव मोडली तर आपल्याला मिळणारे पैसे हे साडे नऊ टक्के व्याज दराने असत नाहीत.

■ गुंतवणूक

**ठेवींचे नुतनीकरण करताना** : अनेक गुंतवणूकदार आपल्या ठेवीची मुदत वाढवित राहतात. मुदत ठेवीची मुदत वारंवार वाढवत राहिल्याने आपल्याला जास्त फायदा मिळेल असे गुंतवणूकदारांना वाटत असते. मुदत ठेव तीन अथवा त्यापेक्षा अधिक वर्षांकरिता पुन्हा गुंतवली तर मुदत संपल्यानंतर फारच कमी व्याज मिळते. त्यामुळे अशा

**सुरक्षिततेचा मुद्दा प्रश्नांकित** : बँकांच्या मुदत ठेवीला सुरक्षिततेच्या मुद्द्यामुळे सर्वाधिक प्राधान्य दिले जाते. बँकांमध्ये ठेवलेले पैसे सुरक्षित राहतात, ते बुडत नाहीत असे सर्वसामान्य गुंतवणूकदाराला वाटत असते. मात्र हा समज तितकासा खरा नाही. गेल्या काही वर्षांत अनेक सहकारी बँका दिवाळखोरीत निघाल्या आहेत. या बँकांचे खातेधारक, ठेवीदार यांचे मोठे नुकसान झाले आहे. अनेकांनी वृद्धापकाळची सोय म्हणून या बँकांमध्ये ठेवलेले मुदत ठेव रुपी पैसे अडकून पडले आहेत. बँकांमधील एक लाख रुपयापर्यंतच्या ठेवींना विमा संरक्षण असते. त्या पुढच्या रकमेला विमा संरक्षण दिलेले नसते. त्यामुळे एक लाखापेक्षा अधिक रकमेच्या ठेवी असुरक्षित असतात. अनेक बँकांची आर्थिक स्थिती चांगली नसल्याचे दिसून येते. सरकारी बँकांमधील पैसा सुरक्षित असतो, मात्र सहकारी बँकांमध्ये ठेवण्यात येणाऱ्या मुदत ठेवी असुरक्षित बनल्या आहेत.

वरील मुद्यांचा विचार करूनच मुदत ठेवी ठेवण्याचा विचार केला पाहिजे. या लेखनामागचा हेतू मुदत ठेवी ठेवू नयेत असा नाही; मात्र गुंतवणूकदारांनी त्यातून मिळणाऱ्या परताव्याबाबतच्या अपेक्षा ठेवताना या गोष्टी विचारात घेणे गरजेचे ठरते.

## तेजीचा झंझावात कायम राहणार?

■ शेअर बाजार

टी-२० स्पर्धा सुरू झाल्यानंतर क्रिकेटच्या मैदानावर धावांचे डोंगर रचणाऱ्या फलंदाजांकडून अत्युच्च धावसंख्येचे अनेक विक्रम प्रस्थापित होत गेले. तशीच स्थिती सध्या भारतीय शेअर बाजाराची झाली आहे. दोन-तीन महिन्यांपर्यंत २२ हजार, २२,५००, २२८०० असे करत करत आता गतसप्ताहात निफ्टीने २३ हजारांच्या पार उडी घेतली आहे. २३,०२६ ही निफ्टी-५० ची नवी उच्चांकी पातळी आहे. युरोपियन बाजार आणि अमेरिकन बाजारातील तेजीचा महत्त्वाचा बूस्टर यासाठी कारणीभूत ठरला असला तरी त्याहून अधिक ऊर्जा मिळाली ती देशांतर्गत घटकांमुळे. त्यांच्या आधारे एका आठवड्यामध्ये निफ्टीने २ टक्क्यांहून अधिक परतावा दिला आहे. सेन्सेक्सनेही गतसप्ताहात ७५ हजारांची पातळी ओलांडून ७५६०० या अत्युच्च पातळीसमीप विसावा घेतला आहे. बँक निफ्टी, निफ्टी फायनान्स सर्व्हिसेस, मिडकॅप निफ्टी या निर्देशांकासह जवळपास सर्वच निर्देशाकांत जबरदस्त तेजी दिसून आली.

गेल्या काही सत्रांमध्ये अमेरिकन बाजारात जोरदार तेजी दिसत असल्याने डाऊ जोन्ससह अन्य प्रमुख निर्देशांक विक्रमी पातळीवर पोहोचले होते. युरोपियन बाजारातही तेजी आहे. त्यामुळे जागतिक पटलावरुन आलेल्या तेजीच्या संकेतांचा प्रभाव भारतीय बाजारावर दिसून आला. पण त्याखेरीज देशांतर्गत पातळीवरील काही महत्त्वाच्या घटनांचा बूस्टर बाजारातील निर्देशांकांना उच्चांकाकडे घेऊन गेला. एक म्हणजे एचएसबीसी फ्लॅश पर्चेसिंग मॅनेजर इंडेक्स (झचख) च्या आकडेवारीनुसार भारतीय अर्थव्यवस्थेने मे महिन्यात निर्यातीत विक्रमी वाढ केली आणि रोजगारामध्ये जवळपास १८ वर्षांतील सर्वात मोठी वाढ नोंदवली. दुसरी गोष्ट म्हणजे, भारतीय रिझर्व्ह बँकेने केंद्र सरकारला नुकताच २.११ लाख कोटी रुपयांचा लाभांश देण्याचा निर्णय घेतला आहे. आरबीआयच्या या निर्णयामुळे केंद्र सरकारला ही वित्तीय तूट भरुन काढण्यात मदत होणार आहे. आरबीआयने लाभांशाच्या रुपात केंद्र सरकारला दिलेली ही आतापर्यंतची सर्वोच्च रक्कम आहे. याआधी आरबीआयने २०१८-१९ मध्ये लाभांश म्हणून १.७६ लाख रुपये केंद्राला दिले होते. याखेरीज भारतीय रुपयाने गेल्या दोन महिन्यातील उच्चांकी पातळी गाठली आहे. मान्सूनची आगेकूच सुयोग्यपणाने होत आहे. याशिवाय लोकसभा निवडणुकांच्या काळातील विविध मुलाखतींमधून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सरकारी कंपन्या आणि खास करुन बँकांचे आर्थिक ताळेबंद, देशातील एकंदर बँकिंगची स्थिती ही मजबूत असल्याचे सातत्याने सांगत आहेत आणि येत्या काळात ती आणखी सुधारेल असे अनुमान वर्तवत आहेत. सर्वोच्च पदावरील व्यक्तीकडून व्यक्त झालेल्या या आत्मविश्वासाला भांडवली बाजाराने दिलेली ही दाद मानली जात आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे विदेशी गुंतवणूकदारांकडून विक्रीचा मारा सुरू असताना ही भरारी घेतल्यामुळे भारतीय बाजारात आता रिटेलर्स आणि देशांतर्गत संस्थात्मक गुंतवणूकदार यांचे वर्चस्व वाढले असल्याचे मानले जात आहे. सेन्सेक्सचा विचार करता १ मार्चनंतरची सर्वांत मोठी झेप त्याने गेल्या सप्ताहात घेतली. निफ्टीने सलग सहा दिवस तेजी दिसून आली आहे.

- **सेन्सेक्स : ७५,४१०.३९ (-७.६५)**
- **निफ्टी : २२,९५७.१० (-१०.५५ )**
- **बँक निफ्टी : ४८,९७१.६५ (+२०३.०५ )**
- **फिन निफ्टी : २१,८५२.३० (+१२०.६५)**

**गतसप्ताहातील शेवटच्या सत्राचे बंदपातळी भाव**

यासंदर्भात दोन महत्त्वाच्या गोष्टी गुंतवणूकदारांनी लक्षात घ्यायला हव्यात. एक म्हणजे निफ्टी-५० ने चालू वर्षाच्या दुसऱ्या आठवड्यात १५ जानेवारी रोजी २२ हजारांची पातळी गाठली होती. त्यानंतर अवघ्या चार महिन्यांमध्ये हा निर्देशांक १००० अंकांनी वधारला आहे. २२ हजार ते २३ हजार या वाटचालीमध्ये आयसीआयसीआय



बँक, महिंद्रा अँड महिंद्रा, स्टेट बँक, रिलायन्स इंडस्ट्रीज, भारती एअरटेल या कंपन्यांचे योगदान सुमारे १४ ते १७ टक्के राहिले आहे. उर्वरीत कंपन्यांच्या समभागांचे मूल्य वाढले असले तरी या कंपन्यांच्या तुलनेत ती वाढ खूप कमी आहे.

आता चालू आठवड्याकडे वळूया. सामान्यतः अशा प्रकारच्या उच्चांकी पातळीला स्पर्श केल्यानंतर थोडी फार घसरण होणे नफावसुलीमुळे अपेक्षित असते. त्यानुसार शुक्रवारच्या सत्रात थोडी फार घसरण दिसूनही आली. टेक्निकल चार्टनुसार विचार केल्यास निफ्टीसाठी २२८०० ची पातळी महत्त्वाची आहे. त्याखाली घसरल्यास २२६०० पर्यंतची घसरण दिसू शकते. याउलट २३हजारांच्या वर स्थिरावल्यास २३,२६० पर्यंत निफ्टी झेपावू शकतो. बँकनिफ्टीसाठी ४८६०० ची पातळी महत्त्वाची आहे. त्याखाली घसरल्यास ४८२०० पर्यंत घसरण दिसू शकते. याउलट ४९ हजारांच्या वर हा निर्देशांक स्थिरावल्यास ४९५०० पर्यंत झेपावू शकतो.

चालू आठवडा हा लोकसभा निवडणूक निकालांपूर्वीचा आहे. तशातच मासिक समाप्ती आहे. इंडिया व्हिक्स अद्यापही २१ टक्क्यांहून अधिक आहे. त्यामुळे या आठवड्यामध्ये बाजारात बऱ्याच वेगाचे चढउतार दिसू शकतात. अमेरिकी फेड रिझर्व्हकडून संभाव्य व्याजदर कपातीबाबत अनिश्चिततेमुळे जागतिक भांडवली बाजारात निरुत्साह निर्माण झाला आहे. तेथील बेरोजगारीचे दावे अपेक्षेपेक्षा अधिक घटले असून कंपन्यांची आर्थिक कामगिरीही उत्तम दिसून आली आहे. त्यामुळे या आठवड्यात काहीशी घसरण होऊन बाजाराचा ट्रेंड बदलण्याचीही शक्यता नाकारता येत नाही. सबब ट्रेडर्स मंडळींनी अत्यंत सावध राहणे गरजेचे आहे. कारण बाजारातील बऱ्याच समभागांचे मूल्य वधारलेले असल्याने खरेदीसाठी त्यांची निवड करणे जोखमीचे ठरू शकते. तथापि, काही समभागांमध्ये खरेदीच्या संधी आहेत. यामध्ये मॅक्स हेल्थकेअर ७८० रुपयांना खरेदी करुन ९३० रुपये लक्ष्य ठेवता येईल. ग्रासिम इंडस्ट्रीजचा समभाग २८५० रुपयांचे लक्ष्य ठेवून खरेदी करता येईल. एलटी फूडसचा समभाग २०० रुपयांच्या पातळीवर खरेदी करुन २२५ रुपये लक्ष्य ठेवता येईल. आयटीची समभाग ५२० रुपयांचे लक्ष्य ठेवून खरेदी करता येईल. जेकेटायरचा समभाग दीर्घकालीन गुंतवणूक म्हणून ६७० रुपयांचे लक्ष्य ठेवून घसरणीत खरेदी करता येईल. बीईएलचा समभाग ३४५ रुपयांचे लक्ष्य ठेवून खरेदी करता येईल. आयआरबीचा समभाग ९० रुपयांचे लक्ष्य ठेवून खरेदी करता येईल.

बाजारात चालू आठवड्यात बाय ऑन डिप्स ही रणनीती प्रभावी ठरेल. तथापि, निफ्टी २३,२०० च्या पातळीवर पोहोचल्यास सेल ऑन राईज ही रणनीती अवलंबता येईल.

## बँक खाते आणि वारसदार

■ बँकिंग

आयुर्विमा उतरवताना, मुदतठेवी ठेवताना वा इतर अनेक ठिकाणी आपल्याला वारसदाराची नोंद करणे सक्तीचे असते. बँकेमध्येही खाते उघडताना 'नॉमिनेशन' अर्थात वारसदाराविषयीची माहिती द्यावी लागते. त्यावरून खातेधारकाचा मृत्यू झाल्यानंतर त्याच्या खात्यातील रक्कम कुणाला द्यावी हे निर्धारित केले जाते. खातेदाराने ज्या व्यक्तीचे नाव वारसदार म्हणून दिले असेल त्याच व्यक्तीला खातेदाराच्या पश्चात बँक खात्यातील रक्कम अथवा लॉकरमधील वस्तू व पैसे दिले जातात. यासाठी वारस प्रमाणपत्र, ॲमिनिस्ट्रेशनचे पत्र अथवा न्यायालयाचा कोणताही आदेश मागितला जात नाही.



फॉर्म डीए-१ : बँकेमध्ये जर खातेधारकाने नॉमिनेशन म्हणून नाव दिलेले नसेल अथवा सध्याचे नॉमिनेशन रद्द केले असेल तर तो 'डीए-१' हा फॉर्म भरून नॉमिनेशन सादर करू शकतो. हा फॉर्म बँकेच्या वेबसाईटवरून डाऊनलोड केला जाऊ शकतो. यामध्ये खातेधारक आणि ठेवींचे विवरण आणि वारसदाराविषयीची सूचना दिली जाते. जॉइंट अकाउंट असेल तर, फॉर्मवर सर्व खातेधारकांची सही असणे आवश्यक असते.

फॉर्म डीए-२ ।: डीए-२ या फॉर्मद्वारे सध्या असणाऱ्या वारसदाराचे नाव काढून टाकता येते. या फॉर्मवर खाते आणि खातेधारकाची माहिती भरावी लागते. तसेच ज्या वारसदाराचे नाव काढून टाकायचे आहे त्याचे नाव आणि पत्ता द्यावा लागतो. जॉइंट अकाउंट असेल तर, फॉर्मवर सर्व खातेधारकांची सही असणे आवश्यक असते.

अल्पवयीन वारसदार असल्यास

अल्पवयीन व्यक्तीचे नाव वारसदार म्हणून दिले असल्यास नॉमिनेशन फॉर्ममध्ये त्याच्या पालकांची माहिती देणे गरजेचे असते. अल्वपयीन व्यक्ती सज्ञान होईपर्यंत खातेधारकाचा मृत्यू झाल्यास त्याच्या खात्यावरील रक्कम संबंधित पालकांना काढण्याचा अधिकार असतो.

एका बँक खात्यासाठी एकच नॉमिनी असू शकतो; मात्र वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये वेगवेगळे नॉमिनी देता येतात. यासाठी वेगवेगळे नॉमिनेशन फॉर्म भरण्याची गरज असते.

'अंगठा' असल्यास साक्षीदारांची गरज

कायदेशीर वारसदाराच्या फायद्यासाठी मृत खातेधारकाचा नॉमिनी रक्कम आपल्याकडे ठेवू शकतो. खातेधारकाची सही साक्षीदारांकडून तपासण्याची गरज नसते; मात्र अंगठ्याची निशाणी असेल, तर दोन साक्षिदारांची गरज असते.

## फायदे सॅलरी अकाउंटचे

■ बँकिंग

सॅलरी अकाउंट हे बचत खात्याप्रमाणेच असते. या खात्यामध्ये आपल्या कंपनीकडून अथवा तुम्ही ज्या संस्थेत काम करत आहात त्या संस्थेकडून आपले वेतन दरमहा जमा केले जाते. सॅलरी अकाउंटवर खातेदाराला वेगवेगळ्या सुविधा दिले जातात. सर्वांत मुख्य सुविधा कर्ज मिळण्याची असते. आपल्या खात्यात दरमहा वेतन रुपाने निश्चित उत्पन्न जमा होते आहे याची कल्पना बँकेला असते. त्यामुळे त्या खातेदाराला किती उत्पन्न मिळते त्याचा किती खर्च होतो. याची संपूर्ण माहिती बँकेकडे असते. अशा खातेदाराला कर्ज देणे कितपत फायदेशीर आहे हे बँकेला कळू शकते.




एखाद्या खातेदाराच्या सॅलरी अकाउंटमध्ये नियमित रुपाने रक्कम शिल्लक पडत असेल तर तो खातेदार बँकेच्या दृष्टीने कर्ज देण्यासाठी सुरक्षित समजला जातो. अशा खातेदाराला बँकेकडून प्री-अप्रूव्हड लोनचा पर्याय दिला जातो. खातेदाराची आर्थिक स्थिती पाहून बँक त्याला स्व:ताहून कर्ज देण्याची तयारी दर्शविते. हे कर्ज घ्यायचे की नाही याचा निर्णय खातेदाराला घ्यायचा असतो.

तुमच्याकडे अधिक पैसे जमा होत असतील तर वेल्थ सॅलरी अकाउंट काढता येते. या खात्याला तुम्हाला बँकेकडून वेल्थ मॅनेजरची सेवा दिली जाते. या व्यवस्थेव्दारे तुमच्या बँकेसंदर्भातील सर्व कामांची पूर्तता केली जाते. सॅलरी अकाउंट अलेल्या खातेदारांना अन्य खातेदारांनेक्षा स्वस्त दराने कर्ज दिले जाते. आपल्या खात्यामध्ये कंपनीकडून दरमहा वेतन जमा होते. त्यामुळे कर्जाचा हप्ता भरला नाही तर खात्यातून बँकेला पैसै काढता येतात. अशा कर्जदारांकडून त्याच्या खात्यातून कर्जाचे हप्ते बँकेला ट्रान्सफर करण्याविषयीची प्रक्रिया बँकेने पार पाडलेली असते. त्यामुळे बँकेच्या दृष्टीने सॅलरी अकाउंट असलेला खातेदार सुरक्षित समजला जातो.

सॅलरी अकाउंटमध्ये पगार रुपाने पैसे जमा होणे बंद झाले आहे असे बँकेला कळले तर खातेदाराला दिल्या जाणाऱ्या सुविधा बंद होतात.

सॅलरी अकाउंट असलेल्या खातेदारांना इंटरनेटचे व्यवहार मोफत करता येतात. ओव्हरड्राफ्ट, पे ऑर्डर डिमांड ड्राफ्ट या सेवांसाठी कोणतेही शुल्क आकारले जात नाही.

सॅलरी अकाउंट उघडण्यासाठी नोकरदारांना कंपनीकडून पत्र घ्यावे लागते. सॅलरी अकाउंट असलेल्या खातेदाराला बँकेकडून पर्सनलाईज्ड चेकबुक दिले जाते. प्रत्येक चेकवर खातेदाराचे नाव प्रिंट केले जाते. त्याबरोबरच वेगवेगळी बिले भरण्याची सुविधाही बँकेकडून दिली जाते. फोन अथवा इंटरनेटच्या माध्यमातून अनेक व्यवहार करता येतात. सेफ डिपॉझिट लॉकर, सुपरसेव्हर फॅसिलिटी त्याचबरोबर मोफत ईमल स्टेटमेंटसारख्या सुविधाही दिल्या जातात.

## बचत खात्यांची पोर्टेबिलिटी

मोबाईलधारकांना त्यांचा नंबर न बदलता सेवा प्रदाता बदलण्याची असलेली सोय पाहता, बँक बचत खातेदारांना 'पोर्टेबिलिटी'ची ही सुविधा प्रदान करणे आजच्या तंत्रज्ञानात्मक प्रगतीत सहज शक्य आहे, असे प्रतिपादन रिझर्व्ह बँकेचे माजी डेप्युटी गव्हर्नर एस. एस. मुंद्रा यांनी केले आहे. त्यांच्या मते सामान्य ग्राहकांच्या सक्षमीकरणासाठी, त्यांना सर्वोत्तम सेवा आणि वाजवी शुल्क रचना असणाऱ्या बँकेत बचत खाते सुरू करण्याचे स्वातंत्र्य हवे.

'बँक खाते पोर्टेबिलिटी' म्हणजे ग्राहक जर एखाद्या बँकेच्या सेवेबाबत असमाधानी असेल तर खाते क्रमांक तोच राखून सर्व संलग्न व्यवहार शिलकीसह तो दुसऱ्या बँकेत आपले खाते हस्तांतरित करू शकतो आणि दुसऱ्या बँकेत नव्याने खाते



उघडण्याची त्याला गरज नाही. 'बँकांच्या सेवा शुल्क रचनेची वाजवी मानके' या आयआयटी, मुंबईचे प्रा. आशीष दास यांनी तयार केलेल्या पाहणी अहवालाच्या अनावरणानिमित्त आयोजित सभेत मुंद्रा यांनी मागील सात-आठ वर्षापासून केवळ चर्चेत असलेल्या 'बँक खाते पोर्टेबिलिटी'चा मुद्दा पुन्हा पटलावर आणला.

**नोकरी बदलल्यावर अनेकांना आपले आयकर विवरणपत्र सादर करताना अडचणी येतात. याचे कारण असे नोकरदार नोकरी बदलल्यावर काही कागदपत्रांची पूर्तता करण्यात अपयशी ठरतात. नोकही बदलल्यावर आयकर विवरणपत्र दाखल करण्याच्या दृष्टीने काही गोष्टींची काळजी घेणे आवश्यक असते. या गोष्टी कोणत्या आहेत हे आपण जाणून घेऊ.**

## नोकरी बदलानंतरच्या आर्थिक बाबी

१) नोकरी बदलण्याच्या धावपळीत अनेकजण पहिल्या कंपनीकडून फॉर्म क्रमांक १६ घेण्यास विसरत असतात. जेव्हा आयकर विवरणपत्र दाखल करण्याची वेळ येते तेव्हा नोकरदारांना फॉर्म क्रमांक १६ चे स्मरण होते. फॉर्म क्रमांक १६ नसेल तर आपल्या उत्पन्नाचा निश्चित आकडा काढता येत नाही. तसेच आपल्या उत्पन्नावर किती आयकर भरावा लागेल याचासुद्धा आकडा काढणे अवघड होते. अशा वेळी हा फॉर्म घेण्यास विसरलेल्या नोकरदारांनी आयकर खात्याच्या संकेतस्थळावर जाऊन फॉर्म क्रमांक २६ डाउनलोड करणे आवश्यक असते. या फॉर्मच्या माध्यमांतून आपल्या बँक खात्यात जमा झालेला पगार आणि त्यावर बसणारा आयकर याचा आकडा काढणे सोपे जाते. फॉर्म क्रमांक २६ मुळे आपल्याला आयकर विवरणपत्र दाखल करणे सोपे होऊन जाते.

२) नोकरदारांची पूर्वीची कंपनी या नोकरदाराचा पगार आणि त्यावर किती कर कापायचा हे कंपनीला तुम्ही तुमच्या गुंतवणुकीची जी माहिती पुरवता त्यावरून निश्चित करत असते. जर तुम्ही नव्या कंपनीला पूर्वीच्या कंपनीत मिळणारे उत्पन्न, कापला गेलेला कर याची माहिती दिली नाही तर नवी कंपनी आर्थिक वर्षाच्या उर्वरित महिन्यांच्या आधारे तुम्हाला



किती आयकर भरावा लागेल, हे निश्चित करते. तुम्ही आयकर कायद्याच्या कलम ८० सी अन्वये अधिक गुंतवणूक केली असेल मात्र नव्या कंपनीच्या आकडेमोडीत कमी रक्कम दाखवली गेली तर तुम्हाला आयकर किती बसणार हे निश्चित करणे अवघड जाते. त्याकरिता आयकर विवरणपत्र दाखल करण्यापूर्वी आपल्या गृहकर्ज, पीपीएफ, आयुर्विमा यातील गुंतवणुकीची कागदपत्रे तयार ठेवावीत.

३) आपल्याला किती आयकर बसेल हे ठरवण्यासाठी जुन्या कंपनीत आपल्याला केल्यानंतर आयकर खात्याच्या संकेतस्थळावर जाऊन आपल्याला किती कर बसेल त्याचा आकडा काढा. जर तुम्हाला अधिक आयकर द्यावा लागणार असेल तर आयकर विवरणपत्र दाखल करण्यापूर्वी हा कर भरून टाका.

४) नोकरी करत असताना पगारातून भविष्य निर्वाह निधी (प्रॉव्हिडंट फंड) च्या रुपाने विशिष्ट रक्कम कापून घेतली जात असते. तेवढीच रक्कम तुमच्या कंपनीकडून जमा केली जाते. नोकरी बदलता त्यावेळी ही सर्व रक्कम नव्या कंपनीत ट्रान्स्फर करण्याचा अथवा ती काढून घेण्याचा पर्याय असतो. यासाठी काही फॉर्म भरून द्यावे लागतात, ते भरून देणे आवश्यक आहे.

## इन्शुरन्स रिपॉझिटरीच्या अंतरंगात...

इन्शुरन्स रिपॉझिटरी या सुविधेद्वारे विमा पॉलिसी, पॉलिसी डीमॅट स्वरुपात सांभाळता येते. शेअर्स आणि बाँड डिपॉझिटरीमध्ये डीमॅट अकाऊंटद्वारे ठेवले जातात त्याचप्रमाणे विमा पॉलिसी इन्शुरन्स रिपॉझिटरीमध्ये ई-इन्शुरन्स अकाउंटमध्ये सुरक्षितरित्या ठेवता येते. कोणत्याही विमापॉलिसी धारकाला ई-इन्शुरन्स खाते काढता येते. इन्शुरन्स रिपॉझिटरीमध्ये खाते उघडण्यासाठी रितसर अर्ज करावा लागतो. वेगवेगळ्या विमा कंपन्यांच्या पॉलिसी असल्या त्या एकाच अकाउंटमध्ये ठेवता येतात.

सध्या तरी फक्त आर्युविम्याच्या पॉलिसी आणि पेन्शन योजनांबाबत ही सुविधा उपलब्ध आहे. लवकरच आरोग्यविमा, वाहनांचा विमा, घराचा विमा यासारख्या विमापॉलिसीही इन्शुरन्स रिपॉझिटरीमध्ये ठेवता येतील.




उपयोग काय?

आपण पॉलिसीची कागदपत्रे सांभाळून ठेवत असतो. मात्र काही कारणांनी ती गहाळ होण्याची शक्यता असते. पॉलिसीची कागदपत्रे गहाळ झाल्यास डुप्लिकेट पॉलिसी मिळविणे एवढे सोपे नसते. त्यासाठी बरेच प्रयत्न करावे लागतात. मात्र आपली पॉलिसी इलेक्ट्रॉनिक फॉर्ममध्ये असले तर पॉलिसीची कागदपत्रे खराब झाली अथवा गहाळ झाली तरी ग्राहकाला काळजी करण्याचे कारण नसते. त्याचबरोबर आपली पॉलिसी इलेक्ट्रॉनिक फॉर्ममध्ये असेल तर आपल्या पत्त्यातील बदल, वारसदाराच्या नावातील बदल यासारखे बदल आपण वेगाने करु शकतो. असे बदल करायचे असतील तर आपल्याला एजंटामार्फत प्रक्रिया पूर्ण करावी लागते. पॉलिसी इलेक्ट्रॉनिक फॉर्ममध्ये असले तर पॉलिसीमधील कोणतेही बदल करणे सोपे जाते.

ई-इन्शुरन्स

अकाउंटकाढण्याकरीता अथवा आपली पॉलिसी डीमॅट फॉर्ममध्ये ठेवण्याकरीता ग्राहकांना कोणत्याही प्रकारचे शुल्क द्यावे लागत नाही. इन्शुरन्स रिपॉझिटरी दिल्या जाणाऱ्या सर्व सेवा मोफत आहेत. आपली सध्याची पॉलिसी इलेक्ट्रॉनिक फॉर्ममध्ये रुपांतरीत करण्यासाठी आपल्याला विमाकंपनीला कोणत्याही प्रकारचे शुल्क द्यावे लागत नाही त्यामुळे तुमच्याकडे जर ई-इन्शुरन्स अकाउंटअसेल तर नवी पॉलिसी घेत असताना ती इलेक्ट्रॉनिक फॉर्ममध्ये घेणे सोपे होवून जाते. आपल्याला अर्जामध्ये ई-इन्शुरन्स अकाऊंटनंबर देऊन इलेक्ट्रॉनिक फॉर्ममधील पॉलीसाचा पर्याय निवडावा लागतो.

# अहमदनगर शहराच्या 'स्थापना दिन' निमित्ताने

जगातील काही मोजक्या शहरांनाच अथवा गावांनाच स्वतःची जन्मतारीख व त्या शहराचे अथवा गावचे संस्थापक कोण आहे? याची माहिती असेल शिवाय देशात ५०० पेक्षा जास्त वर्षांचा इतिहास असलेली मोजकीच शहरं आहेत, त्यातल नगर एक. २८ मे १४९० ला शहर स्थापन झालं.

माझी पाळंमुळं जिथं रूजली आहेत, त्या अहमदनगर शहराच्या आज 'स्थापना दिन' ('वाढ'दिवस कसं म्हणणार आता!). नाव कुठलं का असेना, ज्या भूमीवर आपण वावरतो, जिथल्या प्राणवायूवर जगतो, जिथल्या अन्न-पाण्यावर आपलं भरण-पोषण होतं, त्या गावाच्या भूतकाळ आणि भविष्यकाळाशी आपलं वर्तमान जोडलं गेलेलं असतं. तुम्ही कुठल्याही धर्माशी, पक्षाशी, विचारांशी किंवा झेंड्याशी संबंधित असलात, तरी हे वास्तव नाकारता येत नाही...

एकेकाळी समृद्ध बाजारपेठ म्हणून बगदाद व कैरोनंतर जगात तीन नंबरचे शहर म्हणून नावारूपाला आलेल अहमदनगर. सादा हबशी गुलाम स्वकर्तृत्वावर थेट राज्याचा प्रधानमंत्री बनू शकतो हे दाखवणाऱ्या मलिक अंबरची कार्यभूमी असलेल नगर. मलिक अंबरने सोळा तलाव निर्माण करत जगात पहिल्यांदाच जलसंधारणचे तसेच खापरी नळाने शहराला ५०० वर्षांपूर्वी पाणीपुरवठा करण्याच्या प्रयोगाच शहर. चाँदबीबीच्या शौर्याची आठवण असणार नगर.

शहाजीराजे आणि शरीफजीराजे यांच्या वडिलांनी, मालोजीराजांनी जिथे नवस बोलला त्या शहाशरीफ दर्ग्याच शहर. शहाजीराजे ज्या भातोडीच्या लढाईने सगळ्या देशात युद्धकुशल सेनापती म्हणून प्रसिद्ध झाले ते नगर. संभाजीराजांच्या मृत्यूनंतर २७ वर्ष लढूनही महाराष्ट्र जिंकता न आल्याने निराश झालेल्या औरंगजेबाने शेवटचा श्वास घेतला ते नगर. संभाजीपुत्र शाहूंना ज्या किल्ल्यात कैदेत ठेवलेलं होत ते नगर. शाहू महाराजांचे वडील छत्रपती चौथे शिवाजी महाराज ह्यांचा निर्घृण खून झाला ते नगर शहर.

जिथ नेहरू-पटेल-मौलाना आझाद तुरुंगवासात होते ते नगर. जिथ भारताचा शोध हा ग्रंथ नेहेरुनी लिहिला ते नगर. जिथ गांधीजींच्या खुनाचा कट रचला गेला ते नगर. जिथ पटवर्धन बंधूंनी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला ते नगर.

हा सगळा बरावाईट इतिहास आणि इतिहासाची कवन भूतकाळ आहेत. अहमदनगर शहराचा वर्तमान आणि भविष्य मात्र अवघड आहे.

ब्रिटिशकाळापासून नगरला लष्करी महत्व आलेल आहे. मध्यवर्ती ठिकाण, दळणवळण सोयीचे ह्यामुळे नगरला वाहन संशोधन विकास केंद्र, रणगाडा दल, चिलखती दल, बेसिक ट्रेनिंग रेजिमेंट, यांत्रिकी पायदळ प्रशिक्षण संस्था, खारे-कर्जुने (केके रेंज) हे युद्धसराव आणि प्रात्यक्षिक केंद्र अशा अनेक संस्था नगर शहराच्या भवताली उभ्या राहिल्यात.

इथली सलाबतखानाची कबर असलेली इमारत जी चाँदबीबी महाल म्हणून ओळखली जाते तिची समुद्रसपाटीपासून उंची जवळपास माथेरानइतकी आहे.हे शहर स्थापन करण्यासाठी, त्याला मोठं करण्यासाठी ज्यांनी ज्यांनी हातभार लावला, त्या सर्व जाती, धर्माच्या कर्तबगार व्यक्तींविषयी कृतज्ञता व्यक्त करणं, पुढच्या पिढीला आपला गौरवशाली इतिहास, इथल्या मातीत नांदत असलेला सर्वधर्मसमभाव



आणि सहिष्णुतेची जाणीव करून देणं, पर्यटनाला चालना देत इथल्या तरूण पिढीसाठी रोजगार आणि व्यापारी उलाढाल वाढण्यासाठी हातभार लावणं या हेतूनं नगरचा 'स्थापना दिवस' साजरा व्हावा, अशी अपेक्षा होती. काही गोष्टी साध्य झाल्या. मात्र, बऱ्याच गोष्टी कागदावरच राहून गेल्या. नव्या-जुन्या खासदारांकडून, आमदारांकडून नगरकरांच्या फार काही अपेक्षा नाहीत. मोठे उद्योग नगरला यायला हवेत, इथल्या तरूणाईच्या हाताला काम देण्यासाठी एमआयडीसी गजबजायला हवी, अतिक्रमण व खड्डे मुक्त रस्ते, सार्वजनिक सुविधा, सुशोभीकरण व्हायला हवं, हे तर खरंच आहे, पण कमीत कमी खर्चात पर्यटकांसाठी मूलभूत सुविधा उपलब्ध केल्या, तरीही बरंच काही साध्य होऊ शकेल.

या शहराच्या संस्थापकाचं स्मृतिस्थळ असलेल्या सीना नदीकाठच्या निसर्गरम्य 'बागरोजा'त जाण्यासाठी साधी पाऊलवाट तीन दशकांत तयार होऊ शकली नाही. बागरोजात उद्यान, तिथं येणाऱ्यांना बसण्यासाठी बाकं, संध्याकाळी वास्तुवर प्रकाशझोत टाकण्याची व्यवस्था...नुसतीच आश्वासनं, वाऱ्यावर विरणारी!

नगरचा भुईकोट किल्ला, अष्टकोनी फराहबख्श महाल, डोंगरावरचा सलाबतखान मकबरा, विशाल गणपती, मेहेराबाद, आनंदधाम, रणगाडा संग्रहालय, दत्त देवस्थान, ह्यूम चर्च, स्नेहालय पहायला आता देश-विदेशांतील पर्यटक येतात. त्यांच्यासाठी किल्ल्यात आणि महालावर स्वच्छतागृह व पिण्याच्या पाण्याची सोय अद्याप होऊ शकलेली नाही. विशेष म्हणजे सरकारनं निधी दिलेला असताना ही कामं झालेली नाहीत...

अहमदनगर शहराचा पर्यटन विकास झाला, तर सगळ्यात जास्त फायदा होणार आहे महापालिकेला, इथल्या व्यावसायिकांना. तथापि पिंपळगाव माळवी तलावासह नगर शहराचा पर्यटन विकास आराखडा अजून तयार झालेला नाही, अंमलबजावणी तर दूरच! पर्यटनस्थळांकडे जाणाऱ्या रस्त्यांवर अंतराचा उल्लेख केलेले दिशादर्शक फलक लावणं, एसटी आणि रेल्वेस्थानकांवर माहिती फलक आणि पर्यटनस्थळांविषयीच्या अनाऊन्समेंटस ही लोकप्रतिनिधींसाठी फार मोठी बाब नाही.

अगदी लगतच्या पुणे, नासिक, औरंगाबादमध्ये सुध्दा नसतील इतक्या ऐतिहासिक वास्तू उदा. बागरोजा, दमडी मज्जीद, भुईकोट किल्ला, फराहबख्श महल, भिस्तबाग महल, चाँदबीबी महल, हत्ती बारव, लक्कड महल, खापरी नळ योजना, शहा शरीफ दर्गा इ. आजही इतक्या वर्षाने बऱ्यापैकी स्थितीत आहे. कदाचित त्या सांगत आहेत की, भलेही येथील लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष असेल, प्रशासन बेजबाबदार असेल व लोकांना आमची आस नसेल परंतु आम्ही अजुनतरी आमच्या परीने उभी आहोत कारण आम्ही आजही तुमचे प्रेम मिळवण्याकरिता भुकेले आहोत.

असो, अहमदनगरची स्थापना करणारा अहमदशहा मूळचा परभणी जिल्ह्यातला पाथरीचा कुलकर्णी. आता अहमदनगरचे नाव अहिल्यानगर असे झाले आहे. नाव बदलल्यामुळे तेथील लोकांचीसुद्धा चाल, चरित्र, वागणूक बदलणार आहे काय हा खरा प्रश्न आहे. आता अहिल्याबाई होळकर यांनी घालून दिलेला देश प्रेम, त्याग, समर्पण, सामाजिक सद्भावना याच नागरिक अनुकरण करणार काय?

माझा जन्म सोनगाव तालुका राहुरी येथेचा. बालपणीची काही वर्षे इथंच रमणीय व निसर्गाने नटलेल्या (आता हा अमर्याद वाळू उपशामुळे भकास होत चाललेल्या) अशा प्रवरा नदीकाठी गेली. पुढे शिक्षणासाठी अहमदनगरला आलो व येथे स्थायिक झालो. इतिहास तज्ञ भूषण देशमुख यांनी नगर शहरातील ऐतिहासिक, सांस्कृतिक, धार्मिक, सामाजिक, निसर्ग संपन्न वैभव आम्हाल समजाऊन सांगत ते पाहण्याची दृष्टी दिली व समजून घेण्याचे ज्ञान दिले, यामुळे आम्ही सुद्धा या शहराच्या प्रेमात केव्हा पडलो, हे कळालेसुद्धा नाही.

'स्थापना दिना'साठी खूप शुभेच्छा...!

**- ॲडव्होकेट श्याम आसावा, अहमदनगर**

# आपले अहमदनगर @ ५३४

**सर्वप्रथम ऐतिहासिक अहमदनगरच्या ५३४ व्या स्थापना दिनाच्या सर्वांना मनपूर्वक हार्दिक शुभेच्छा**

पाचशेहुन अधिक वर्षांचा ज्ञात इतिहास असणारे, आपला स्वतःचा स्थापना दिन माहीत असणारे व तो दरवर्षी नियमितपणे आणि मोठ्या उत्साहात साजरा करणाऱ्या ऐतिहासिक अहमदनगर शहराचा इतिहास अत्यंत उज्वल आहे. सीना नदीच्या काठी आणि मुळा, प्रवरा, गोदावरी या जीवनदायिनी नद्यांच्या खोऱ्यात वसलेले हे एक ऐतिहासिक महत्वाचे शहर आहे. या नद्यांच्या प्रवाहीपणामुळे या परिसरातील जीवनात चैतन्य निर्माण झाले आहे. हा पूर्ण परिसर सुजलाम, सुफलाम झाला आहे. नदीच्या काठी वसणाऱ्या 'अहमदनगर' या नगरीने स्वतःची संस्कृती निर्माण केली, इतिहास निर्माण केला आहे.

पाचशे चौतीस वर्षांपूर्वी अहमद निजामशहा यांनी २८ मे १४९० रोजी भिंगार जवळ सीना नदीच्या काठी स्थापन केलेल्या निजाम शाहीच्या राजधानीचे शहर म्हणजे हे काना मात्र वेलांटी नसणारे अहमदनगर शहर. मध्ययुगीन जगाच्या इतिहासात कैरो आणि बगदाद या तात्कालिक जगातील सर्वात सुंदर शहरांबरोबर तुलना होणारे देखणे उद्यानाचे शहर. शहरात असणाऱ्या फरहाबक्ष महाल, चांदबीबीचा महाल (सलाबत खानाची कबर), हस्त बेहस्तबाग महाल, शहराचा संस्थापक अहमद निजामशहा ज्या वास्तूत चिर निद्रा घेतोय ते बागरोजा, भिंगार जवळ असणारी दमडी मस्जिद, ज्या दर्गाच्या नावावरून हिंदवी स्वराज्य संकल्पक शहाजीराजे व त्यांचे बंधू शरीफजी राजे यांची नावे ठेवली ती प्रसिद्ध शहा शरीफ दर्गा, दो बोटी चिरा अश्या एक ना अनेक ऐतिहासिक वास्तू या शहराच्या गतवैभवाची साक्ष देत आजही दिमाखात उभ्या आहेत.

प्राचीन आणि मध्ययुगीन महाराष्ट्राच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक वारश्यात मोलाची भर घालणारे शहर म्हणून अहमदनगर शहराची ओळख आहे. वारकरी संप्रदायाचा पाया घालणाऱ्या संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांपासून या भूमीची साहित्याशी नाळ जोडलेली आहे. खेळण्या बागडण्याच्या वयात, 'आता विश्वात्मकें देवे' म्हणत सकला मानव जातीच्या कल्याणासाठी पसायदान मागणाऱ्या माउलींनी याच भूमीतल्या नेवासा येथे पैस खांबाला टेकून ज्ञानेश्वरीची रचना केली. साईबाबांनी याच भूमीतून 'श्रद्धा आणि सबुरीचा' सल्ला दिला. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच...!!' अशी सिंह गर्जना लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी याच मातीतून केली आणि स्वातंत्र्य चळवळीत प्राण फुंकले. तर स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या महात्मा फुलेंना स्त्री शिक्षणाची प्रेरणा देणारी भूमीही हीच होय. इथल्याच भुईकोट किल्ल्यात ४२ च्या चले जावं चळवळीतील पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल, मौलाना अबुल कलाम आझाद आदी राष्ट्रीय नेत्यांना स्थानबद्ध करण्यात आले. त्याच वेळी पंडितजींनी 'डिस्कवरी ऑफ इंडिया' अर्थात भारत एक खोज या भारताच्या पाच हजार वर्षाच्या इतिहासाचे लेखन केले.

साधू संतांची जशी ही भूमी आहे तसेच देशभक्त महापुरुषांची ही भूमी आहे. छत्रपती शिवरायांनी आपल्या स्वराज्याची निर्मिती करत असतांना ज्या 'गनिमी काव्याचा' प्रभावी वापर केला त्या गनिमी काव्याचा पहिला प्रयोग स्वराज्य संकल्पक शहाजी राजेंनी इथल्याच 'भातोडीच्या लढाईत' केला. पाच लाखाची फौज घेऊन मराठ्यांचे स्वराज्य नामशेष करायला दख्खनेत समक्ष उतरलेल्या मुघल बादशहा औरंगजेबने चिवट महाराष्ट्रापुढे याच ठिकाणी आलमगीरला देह ठेवला. स्वतंत्रपूर्व काळात कोल्हापूरचे छत्रपती चौथे शिवाजी महाराज इथल्याच भुईकोट किल्ल्यात इंग्रजांकडून मारले गेले, त्यांची समाधी आजही आम्हा नगरकरांना त्यागाची, बलिदानाची, राष्ट्रभक्तीची सदैव प्रेरणा देत असते. सहकाराची देणं महाराष्ट्राला आणि भारताला देणारा हा जिल्हा. आशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना आजही प्रवरानगर येथे दिमाखात उभा आहे...!!

जगाला श्रद्धा आणि सबुरीचा संदेश देणारे सच्चिदानंद सद्गुरू साईनाथ महाराजांचे जगप्रसिद्ध साईबाबा संस्थांना शिर्डी ही याच ऐतिहासिक भूमीत आहे. जगभरातून लाखो भाविक दरवर्षी बाबांच्या समाधी मंदिराला भेट देऊन नवी ऊर्जा, श्रद्धा प्राप्त करतात. तर,

*निलांजन समाभासं रविपुत्रम यमाग्रजम,*
*छाया मार्तंड संभुतंम तं नमामि शनैश्चरंम*

अशी सूर्यपुत्राची आराधना करायला देशविदेशातून भाविक घराला दार नसलेल्या शनी महाराजांच्या पावन अशा शिंगणापूर गावात येतात. अठ्ठावीस वर्षे घोंगडीवर बसून आपल्या राज्याचा आदर्श कारभार करून नारीशक्तीचा वस्तुपाठ जगासमोर ठेवणाऱ्या राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचा जन्म ही याच अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी गावातील. इथल्याच मातीने, पाण्याने त्यांचे भरणपोषण असे केली की जगाला एक आदर्श रणरागिणी, राज्यकर्ता मिळाली. अष्टविनायक गणपतीपैकी एक असणारा कर्जत तालुक्यातील सिद्धटेकचा सिध्दीविनायक आपली कृपादृष्टी सर्वांवर धरून आहे तर तेव्हाच पाथर्डीतील मोहटादेवी आणि मढीचे कानिफनाथ मंदिर लाखो भक्तांचे श्रद्धास्थान आहे तसेच पाथर्डीमधील भगवानबाबा गड हे देखील जगभरातील भक्तांचे श्रद्धास्थान आहे. नगर तालुक्यातील मठपिंप्री या गावात बाराव्या शतकात श्री चक्रधर स्वामींनी वास्तव्य करून हजारो अनुयायींना उपदेश केले.त्याच वेळी पद्मभूषण अण्णा हजारे यांचे राळेगण सिध्दी आणि पद्मश्री पोपटराव पवार यांचे हिवरे बाजार म्हणजे जलसंधारण आणि ग्रामविकासाचे मॉडेल आणि प्रेरणास्थान. वंचित शोषित घटकांना, महिलांना मुख्य प्रवाहात आणण्याच्या कामात डॉ गिरीश कुलकर्णींच्या स्नेहालयने आज जगात ठसा उमटवला आहे. तर डॉ. धामणे पती पत्नीच्या मनोविकास प्रकल्पांची जगाने दखल घेतली आहे. ही सर्व ही धार्मिक नसली तरी सामाजिक तीर्थक्षेत्रेच. यांनी ही नगरच्या वैभवात भरच घातली आहे.

नुकताच भारताने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा केला, त्यापूर्वी १९९७ मध्ये स्वातंत्र्याचा सुवर्ण महोत्सव साजरा करत असताना इथल्याच महावीर कला दालनात भारतातील प्रसिद्ध चित्रकार, मूर्तिकार प्रमोद कांबळे यांनी भारताच्या जडणघडणीत योगदान देणाऱ्या पुराण काळातील ऋषीमुनींपासून ते आधुनिक काळातील राष्ट्रीय अदर्शांचे 'सारे जहा से अच्छा...!!' हे पेन्सिल ने काढलेले भितीचीत्र आवर्जून पाहायलाच हवे असे आहे. फराहबक्ष महालाच्या जवळचा आशिया खंडातील एकमेव असलेला टँक म्युझियम आणि तिथे असलेला दुसऱ्या महायुद्धातील पॅटर्न टँक नाही पाहिला तर मग तुम्ही काय पाहिलं? या शिवाय अमहादनगर ऐतिहासिक वस्तू संग्रहालय, आनंद ऋषींच्या जन्माने पावन झालेले चिचोंडी तर पदस्पर्शाने पावन झालेले आनंदधाम, अलीकडेच उभा राहिलेला देखणा उड्डाण पूल आणि त्याच्या खांबावरील युगपुरुष, शककर्ता छत्रपती शिवरायांचा जीवनपट हे सगळ काही अलौकिक, अद्भूत, अवर्णनीय....!!

मित्रहो, या सर्व बाबी अहमदनगरच्या भूषण आहेत. त्यांचा उल्लेख केल्याशिवाय या अहमदनगर स्थापना दिनाच्या शुभेच्छाना अर्थ प्राप्त होणार नाही. आज भुतलावरच्या या अद्भुत शहराच्या स्थपनादिनाच्या निमित्ताने महाराष्ट्राच्याच नव्हे तर जगाच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या सर्व सृजनशील, रसिक, इतिहास प्रेमींचा मेळावा या अहमदनगर नगरीत भरला आहे. निमित्ताने आमच्या ऐतिहासिक अहमदनगर नगरीत दाखल झालेल्या तमाम बांधवांनो आणि भगिनींनो, काय आहे तुमच्या अहमदनगरमध्ये असा विचार न करता वेळ मिळेल तेव्हा आणि तसे अहमदनगर शहराच्या ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक वैभवाच्या या खुणांना आवश्य प्रत्यक्ष भेट द्या आणि आनंद घ्या ......!!

**श्रीनिवास एल्लाराम**, मो.९४२१२००१३९

# अधिकृत नसलेल्या पदाधिकाऱ्यांनी अनधिकृतपणे उमेदवारी केली घोषित

**कचरे यांच्या उमेदवारीला टीडीएफमधूनच विरोध; पाचही जिल्ह्यातील टीडीएफच्या पदाधिकाऱ्यांशी समन्वयाने उमेदवाराची घोषणा करणार**



भाऊसाहेब कचरे यांच्या उमेदवारीला विरोध करत टीडीएफचे शिक्षक एकवटले.

नगर - अहमदनगर जिल्हा टीडीएफ (महाराष्ट्र शिक्षक लोकशाही आघाडी) व माध्यमिक शिक्षक संघाच्या सहविचार सभेत नुकतेचे टीडीएफची उमेदवारी मिळाल्याची घोषणा झालेल्या भाऊसाहेब कचरे यांच्या उमेदवारीला विरोध दर्शविण्यात आला आहे. तर अहमदनगर जिल्हा टीडीएफ जळगाव, नाशिक, धुळे, नंदुरबार जिल्ह्यातील टीडीएफच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करुन शिक्षण क्षेत्रात कार्यरत व टीडीएफ मधील सक्रीय शिक्षकाला सर्वानुमते उमेदवारी जाहीर केली जाणार असल्याचे घोषित करण्यात आले. तर जे टीडीएफचे अधिकृत पदाधिकारी नाही, त्यांनी घोषणा केलेला उमेदवारही अनाधिकृत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

नाशिक विभाग शिक्षक मतदार संघातून टीडीएफने सेवानिवृत्त शिक्षक भाऊसाहेब कचरे यांना उमेदवारी जाहीर केल्याने टीडीएफमध्ये नवा वाद पेटला असून, सक्रीय टीडीएफचे पदाधिकारी सर्वांच्या सहमतीने नवीन उमेदवार देण्याच्या तयारीत आहे. शहरातील माध्यमिक शिक्षक सोसायटीत राज्य माध्यमिक शिक्षक संघटना फेडरेशनचे उपाध्यक्ष चांगदेव कडू यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सहविचार सभेसाठी टीडीएफचे जिल्हाध्यक्ष एम. एस. लगड, माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष आप्पासाहेब शिंदे, सचिव राजेंद्र खेडकर, विठ्ठलराव पानसरे, महेंद्र हिंगे, बाळासाहेब मुळे, प्रशांत होन, संभाजी गाडे, उमेश गुंजाळ, बाळकृष्ण चोपडे, देविदास पालवे, धनंजय गिरी, बबन लांडगे, प्रसाद साठे, साहेबराव रक्टे, कैलास मोकळे, बाळासाहेब जठार, पंकज जगताप, बाबासाहेब गुंजाळ, संतोष ठाणगे, प्रसाद साठे, भानुदास तमनर आदींसह शिक्षक उपस्थित होते.

महाराष्ट्र शिक्षक लोकशाही आघाडीचे अध्यक्ष नानासाहेब बोरस्ते नसून विजय बहाळकर आहेत. महासचिव हे पदच संघटनेच्या कार्यकारिणीत नाही, परंतु सध्या स्वयंघोषित असलेले बोरस्ते व हिरालाल पगडाल यांनी नाशिक विभागाची उमेदवारी जाहीर करताना पुणे येथे पाच लोक उपस्थित होते. त्यावेळी उमेदवारी जाहीर करण्यात आली, तर इतर चार जिल्ह्याचे अध्यक्ष निषेध नोंदवून निघून गेले. नुकतेच नाशिकचे संदीप गुळवे यांची उमेदवारी घोषित करण्यात आली, त्यामुळे सध्याची टीडीएफ बोगस असल्याचे सिद्ध झाले आहे. चार भिंतीच्या आत बसून टीडीएफचा उमेदवार निवड करायचा हे शिक्षकांना मान्य नाही. त्यामुळे दोन दिवसांमध्ये नाशिक विभागीय टीडीएफची बैठक घेण्यात येणार आहे. यामध्ये नाशिक विभागातील पाचही जिल्ह्यामधून सेवेत असणारे पदाधिकारी एकत्र बसून उमेदवारी बाबत निर्णय घेणार असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

एम. एस. लगड म्हणाले की, टीडीएफच्या उमेदवाराची समन्वय समितीने विश्वासात न घेता नाशिक विभाग शिक्षक आमदार निवडणुकीसाठी उमेदवार जाहीर केला आहे. दिलेला उमेदवार आम्हाला मान्य नाही. अधिकृत उमेदवार सर्वांना विचारात घेऊन जाहीर केला जाणार असून, कचरे यांना अहमदनगर जिल्हा टीडीएफ व माध्यमिक शिक्षक संघाचा पाठिंबा नसल्याचे त्यांनी सांगितले.

आप्पासाहेब शिंदे म्हणाले की, ज्यांनी उमेदवारी जाहीर केली त्यांना टीडीएफचा उमेदवार जाहीर करण्याचा अधिकार नाही. कार्यरत शिक्षकाला उमेदवारी मिळावी व तो निवडून यावा हीच सर्वांची भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले.

मुस्ताक सय्यद यांनी आर्थिक देवाण-घेवाण करुन टीडीएफची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. टीडीएफशी संबंध नसताना त्या उमेदवाराला उमेदवारी मिळाली कशी? हा प्रश्न उपस्थित करुन नवीन उमेदवार देण्यासाठी पाच सदस्यांची कमिटी नेमण्याची त्यांनी भूमिका मांडली.

प्रास्ताविकात राजेंद्र खेडकर यांनी शिक्षकात कार्यरत असलेला व शिक्षकांच्या प्रश्नावर लढणारा उमेदवारच शिक्षक आमदार झाल्यास शिक्षकांचे प्रश्न सुटणार असल्याचे स्पष्ट केले.

दादासाहेब देशमुख म्हणाले की, शिक्षकांचे प्रश्न सोडविणारा आणि शिक्षकांना आधार देणाऱ्या व्यक्तीच्या मागे सर्वांनी उभे रहावे. टीडीएफच्या विरोधात काम करणाऱ्यांना तिकीट देऊ, उमेदवारी रद्द करण्याची मागणी केली.



शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिर येथे पत्रकार उदय निरगुडकर यांनी भेट दिली असता त्यांचे हस्ते गणेशाची आरती करण्यात आली. यावेळी देवस्थानच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अध्यक्ष अभय आगरकर, उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे, विश्वस्त पांडुरंग नन्नवरे, नितीन पुंड आदी.

# नाशिक विभाग शिक्षक मतदारसंघात 'स्वाभिमानी'ची भूमिका ठरणार निर्णायक



जिल्हाध्यक्ष प्रसाद शिंदे

नगर - नाशिक शिक्षक मतदार संघाची निवडणूक नुकतीच जाहीर झाली असून २६ जून रोजी प्रत्यक्ष मतदान होणार आहे या माध्यमातून विविध भागातून इच्छुक उमेदवार उभे आहेत या निवडणुकीमध्ये स्वाभिमानी शिक्षक संघटनेची भूमिका निर्णायक ठरणार आहे. नाशिक विभागातील पाचही जिल्ह्यांमध्ये स्वाभिमानी शिक्षक संघटनेचे प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, अल्पसंख्यांक विभागात प्राबल्य आहे. या माध्यमातून स्वाभिमानी शिक्षक संघटना ज्या उमेदवारास पाठिंबा देईल तो उमेदवार निश्चितच विजयी होईल अशी माहिती जिल्हाध्यक्ष प्रसाद शिंदे यांनी दिली.

शिंदे म्हटले आहे की स्वाभिमानी शिक्षक संघटनेच्या माध्यमातून नाशिक शिक्षक मतदार संघातील पाचही जिल्ह्यांमध्ये शिक्षकांच्या विविध प्रश्नावर मार्ग काढण्याचे काम स्वाभिमानी शिक्षक संघटनेच्या जिल्हा अध्यक्षांकडून होत आहे. विनाअनुदानित, अंशतः अनुदानित शिक्षकांच्या वेतनाचा प्रश्न सोडवण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून आझाद मैदान येथे वेळोवेळी आंदोलन करून महाराष्ट्रातील हजारो शिक्षकांना लाभ मिळवून देण्यासाठी संघटनेचा मोठा वाटा आहे

अहमदनगर अहमदनगर जिल्ह्यात स्वाभिमानी शिक्षक संघटनेचे प्राबल्य मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे सर्व तालुक्यात तालुका अध्यक्ष शिक्षकांच्या विविध प्रश्नावर कार्य करत आहे जिल्हा पातळीवर शिक्षकांचे विविध प्रश्न सोडवण्यासाठी जिल्हाध्यक्ष प्रसाद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्य सुरू आहे अहमदनगर जिल्ह्यामध्ये महिला शिक्षका भगिनींचा मोठा सहभाग संघटनेमध्ये असल्यामुळे संघटना जिल्हाभर सक्षमपणे आपले कार्य करत आहे

या माध्यमातून राज्याध्यक्ष के पी पाटील, राज्य पदाधिकारी, सर्व जिल्हाध्यक्ष, अहमदनगर जिल्हाध्यक्ष प्रसाद शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत नाशिक शिक्षक मतदार संघातील उमेदवारास पाठिंबा देण्यासाठी नाशिक येथे राज्यस्तरीय बैठकीचे आयोजन केले जाणार आहे अशी माहिती शिंदे यांनी दिली.

# शिक्षकांसाठी त्रिस्तरीय वेतनश्रेणीच्या अनुषंगाने निशुल्क प्रशिक्षण राबवावे : शिक्षक परिषदेची मागणी

नगर - राज्यातील खाजगी, अनुदानित, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील शिक्षकांना लागू करण्यात आलेल्या त्रिस्तरीय वेतनश्रेणीच्या अनुषंगाने निशुल्क प्रशिक्षण देण्याची मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने माजी शिक्षक आमदार नागो गाणार व नागपूर विभाग शिक्षक परिषदेच्या वतीने विभाग कोषाध्यक्ष संतोष सुरावार यांनी शिक्षण आयुक्त व शिक्षण संचालकांना निवेदन दिले असल्याची माहिती शिक्षक परिषदेचे शहर जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांनी दिली.

राज्यातील खाजगी, अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील शिक्षकांना लागू करण्यात आलेल्या त्रिस्तरीय वेतनश्रेणीच्या अनुषंगाने प्रशिक्षण देण्यात आले. त्या शिक्षकांना वरिष्ठ/निवड वेतनश्रेणीचा लाभ देण्यात आला. परंतु प्रशिक्षणाची संधी उपलब्ध न झालेल्या शिक्षकांना वरिष्ठ/निवड वेतनश्रेणीचा लाभ देय ठरला नाही. त्यांच्याकरिता शैक्षणिक सत्र २०२४-२५ मध्ये ऑनलाईन/ऑफलाइन प्रशिक्षणाचे नियोजन व सनियंत्रण राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण महाराष्ट्र राज्य पुणे मार्फत करणे अत्यावश्यक आहे. वरिष्ठ वेतन श्रेणी व निवड श्रेणी मंजुरीसाठी आवश्यक असणारे ऑनलाइन प्रशिक्षण प्रमाणपत्र नसलेले अनेक शिक्षक बांधवांना प्रस्ताव मंजूर होण्यासाठी बाधा निर्माण होत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाद्वारे इयत्ता दहावी व बारावीच्या प्रत्येक विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्कासह शिक्षक प्रशिक्षणाचे शुल्क घेण्यात येते. त्यामुळे शिक्षकांना निशुल्क प्रशिक्षण देणे शासन-प्रशासनाची जबाबदारी ठरते. सदर प्रशिक्षणाकरिता कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारण्यात येऊ नये, असे निवेदनात म्हंटले आहे.

राज्यातील खाजगी, अनुदानित, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील शिक्षकांना लागू करण्यात आलेल्या त्रिस्तरीय वेतनश्रेणीच्या अनुषंगाने निशुल्क प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करावी, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता वरिष्ठ/निवड श्रेणीसाठी ऑनलाईन/ऑफलाइन प्रशिक्षण सुरू करण्याबाबत आदेश निर्गमित करण्याची शिक्षक परिषदेतर्फे मागणी करण्यात आली आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

